# स्त्री मुक्ती
# समतेकडे वाटचाल

कालिंदी देशपांडे

कुंदा दातार स्मृती व्याख्यानमाला १९८८

# स्त्री मुक्ती

## समतेकडे वाटचाल

कालिंदी देशपांडे

मागोवा प्रकाशन

मागोवा प्रकाशन : ३४

स्त्री मुक्ती : समतेकडे वाटचाल
कालिंदी देशपांडे

८ मार्च १९८८

© गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

प्रकाशक/मुद्रक
सुधीर बेडेकर
मागोवा प्रकाशन
७५९/९७ डी, डेक्कन जिमखाना
शांति भुवन, पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ४११०३०

मूल्य पाच रुपये

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४११००४ या संस्थेच्या विद्यमाने चालवण्यात येणाऱ्या कुंदा दातार स्मृती व्याख्यानमालेमध्ये दिनांक २५, २६ व २७ फेब्रुवारी १९८८ रोजी श्रीमती कालिंदी देशपांडे यांनी दिलेली तीन व्याख्याने या पुस्तिकेत प्रकाशित होत आहेत. गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक, श्रीमती कालिंदी देशपांडे आणि श्री. बी. एन. दातार यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रकाशक

# प्रास्ताविक

गेल्या काही वर्षांत स्त्रियांच्या प्रश्नावर अनेक पातळ्यांवर चर्चा होत आहेत. नेमक कालखंड बोलायचा झाला तर यूनोने प्रथम १९७५ साल आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले आणि त्या वर्षांत महिलांच्या, विशेषेकरून तिसऱ्या जगातील, विकसनशील देशातील महिलांच्या परिस्थितीवर जो प्रकाश पडला आणि जे दारुण भयानक सत्य बाहेर आले त्यावरून पुढील १० वर्षांत महिलांच्या परिस्थितीत काही सुधारणा व्हावी ह्या उद्देशाने १९७० ते १९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर केले गेले. भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर ह्या दशकाची सुरुवातच आणीबाणीपासून झाली. म्हणजे ज्या ठिकाणी समाजातले जे घटक आजवर थोड्याफार प्रमाणात का होईना आपल्या लोकशाही अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी झटत होते त्यांचीसुद्धा दडपणूक व गळचेपी करण्यात आली, त्या ठिकाणी ज्यांना आपल्या अधिकारांची जाणीवसुद्धा नाही व एरवीसुद्धा ज्या तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत होत्या, त्या स्त्रियांचा तर प्रगतीचा व विकासाचा मार्ग सर्वच बाजूंनी कुंठीत झाला. ह्या काळ्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या महिला दशकाचा १९८५ साली जेव्हा आढावा घेण्यात आला तेव्हा महिला दशक हे भारतीय स्त्रीच्या बाबतीत प्रगतीचे दशक नसून परागतीचेच दशक आहे असे आढळून आले.

खरे तर १९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून नेटाने जोम धरलेल्या सामाजिक चळवळीने स्त्रियांना मनुष्य म्हणून असलेल्या आपल्या अस्तित्वाची प्रथम जाणीव करून दिली आणि स्वातंत्र्य चळवळीने त्यांच्या देशभक्ती, शौर्य, दृढनिश्चय अशा अनेक गुणांना आवाहन केले. हजारो स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत हिरीरीने आणि उत्साहाने भाग घेतला आणि प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती दिली. साम्राज्यवादी ब्रिटिश अधिसत्तेचा न्हास करणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा महत्त्वाचा सहभाग होता. आपल्याला दडपणाऱ्या प्रत्येक शक्तीबरोबर त्यांनी हिरीरीने लढे उभे केले. ग्रामीण भागातील स्थानिक जमीनदार असोत, अथवा निजामाचे सशस्त्र सैनिक असोत, मुंबई आणि अन्य औद्योगिक शहरातले गिरणीमालक असोत, श्रीमंत कारखानदार असोत, सरकारी नोकरशहा आणि पोलिस असोत, ह्या सर्व दडपशहांविरुद्ध गिरणीमजूर स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया, आदिवासी आणि खाणमजुरी करणाऱ्या स्त्रिया, ज्यूट-काथ्या-तंबाखू इ. कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रिया, सर्ववर्गीनी आपापल्या क्षेत्रात आपल्या अधिकारासाठी

लढे उभे केले आणि स्वातंत्र्य चळवळीला खऱ्या अर्थाने लोकाधिष्ठित चळवळीचे स्वरूप प्राप्त करून दिले. किमान वेतन आणि समान कामासाठी समान वेतन ह्या मागणीसाठी १९३० साली मद्रास प्रेसिडेन्सीमधे गिरणीमजूर स्त्रियांनी संप केला होता हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

त्यानंतर १९४७ मधे स्वराज्य मिळाले आणि १९५० साली भारतीय गणराज्याने स्वीकृत केलेल्या घटनेने स्त्रियांना काही अधिकार निदान कागदोपत्री बहाल केले. स्त्री म्हणून, स्वतंत्र लोकशाही देशाची नागरिक म्हणून, शेतात, कारखान्यात, मळ्यात, खाणीत काम करणारी मजूर म्हणून, ऑफीस, बँका, इस्पितळे इ. ठिकाणी काम करणारी कर्मचारी म्हणून किंवा निव्वळ गृहिणी म्हणून तिचा दर्जा सुधारण्याची तिची आशा पल्लवित झाली. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात तिचा दर्जा सुधारण्याची गोष्ट तर बाजूलाच राहिली, चहूबाजूंनी तिच्या स्वातंत्र्याचा, तिने लढून मिळवलेल्या अधिकारांचा लोप पावत आहे. एक मनुष्य म्हणून जगण्याचा तिचा मूलभूत अधिकारसुद्धा हिरावून घेतला जात आहे. पण जेव्हा अशा प्रकारे दडपणांची आणि अत्याचारांची पराकाष्ठा होते तेव्हाच आतल्या आत धुमसणारा असंतोषाचा अंगार वडाग्नीचे रूप धारण करतो हे इतिहासाने वारंवार सिद्ध केले आहे. गेल्या १०/१२ वर्षात स्त्रियांनी आपल्या गुलामगिरीचे जोखड उखडून टाकण्यासाठी कधी एकेकटीने तर कधी सामूहिकरीत्या, कधी उत्स्फूर्तपणे तर कधी संघटित होऊन, शहरात आणि ग्रामीण भागात सातत्याने आणि दृढनिश्चयाने अनेक प्रयत्न केले आहेत. आणि त्यातूनच स्त्री-मुक्तीची चळवळ उभी राहिली आहे.

मात्र ह्यावरून कुणी असा निष्कर्ष काढला की स्त्री-मुक्ती चळवळ ही एकाच विशिष्ट सिद्धान्तावर आधारलेली एकमार्गी, एकसंध व एकजीव चळवळ आहे तर मात्र ते चुकीचे ठरेल. एक तर कोणत्याही चळवळीला इतके एकसंध स्वरूप प्राप्त व्हायला अनेक वर्षे लागतील व मुख्य म्हणजे एवढी प्रगत व परिपक्व अवस्था प्राप्त होईपर्यंत ती चळवळ, चळवळ ह्या स्वरूपात न राहता तो प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनक्रमाचाच भाग होईल. चळवळ म्हटली की त्यात जसा प्रवाहीपणा आला, तसेच विविध प्रवाहही आले. जीवनानुभवातून सामूहिक प्रश्नाला वाचा फुटणे, त्या प्रश्नाचे सैद्धांतिक आकलन होणे, त्या सिद्धांतावर आधारित लढ्याचा मार्ग ठरवणे व तो मार्ग आक्रमत असता येणाऱ्या नव्या अनुभवांच्या आधारावर सिद्धांताचे पुनः परिष्करण करणे हा कोणत्याही जिवंत चळवळीचा नियम असतो. भारतासारख्या व्यामिश्र समाजात वेगवेगळ्या परिस्थितीत काम करणाऱ्या वेगवेगळ्या संघटनांचे सैद्धांतिक आकलन ह्यात तफावत असणे, प्रसंगी जमीन-अस्मानाचा फरक असणे अपरिहार्यच आहे. स्त्री-मुक्ती चळवळीतही आज त्यामुळे अनेक प्रवाह आढळतात. मी ज्या संघटनेचे काम करते ती ऑल इंडिया डेमॉक्रॅटिक वुमेन्स असोसिएशन (अखिल भारतीय जनवादी महिला सभा) काही राज्यात अनेक वर्षे वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या स्वरूपात काम करत होती; आजच्या अखिल भारतीय स्वरूपात तिची अधिकृत स्थापना १९८१ साली झाली. तेव्हापासून ते

आजतागायत स्त्रियांच्या घसरत चाललेल्या दर्जाविरुद्ध काम करताना, लढे उभे करताना जे अनुभवांचे भांडार गोळा झाले, संघर्षाच्या मार्गात आड येणाऱ्या ज्या शक्तींची, प्रवृत्तींची ओळख झाली, बरोबरीने झुंज देऊन सहकार्य करणाऱ्या समाजाच्या इतर घटकांचा जो परिचय झाला, आणि ह्या सर्व धडपडीतून जी दिशा स्पष्ट होत गेली त्याचा आढावा मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

ह्यासाठी पहिल्या प्रकरणात स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषत गेल्या दहाबारा वर्षांत वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांवरचा अन्याय कसकसा वाढत गेला व त्याविरुद्ध कसे संघर्ष उभे राहिले ह्यांचा प्रामुख्याने दिल्लीत झालेल्या कामाच्या आधारावर काही तपशील मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. दुसऱ्या प्रकरणात असे संघर्ष करताना व लढे उभारताना काही सामाजिक, राजकीय व आर्थिक गटांच्या सामर्थ्याची कशी प्रचीती आली व ह्या गटांनी व्यावहारिक पातळीवर कशा अडचणी निर्माण केल्या ह्याचे विवेचन असेल. आणि तिसऱ्या प्रकरणात ह्या अनुभवांमधून हे सामर्थ्यशाली गट आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याकरता स्त्रियांसारख्या समाजाच्या एका दुर्बल घटकाचा कसा बळी देतात, व ह्या गटांचे परस्परसंबंध काय असतात ह्यामागील रहस्य कसे उलगडत गेले व त्यातून आमच्या संघटनेच्या स्त्री-मुक्ती आंदोलनासंबंधी जाणीवा कसकशा स्पष्ट होत गेल्या हे पाहायचे आहे.

□

# १. स्त्रियांच्या चळवळीची वाटचाल

सर्वसाधारणपणे स्त्रियांची पिळवणूक म्हटली की लोकांना एकदम डोळ्यासमोर येते स्त्रियांचे कौटुंबिक स्थान, तेही शहरी मध्यमवर्गीय किंवा कनिष्ठ मध्यमवर्गीय स्त्रियांचे. अर्थात त्याचे महत्त्व नाही असे नाही; परंतु स्त्रियांच्या घसरत्या दर्जाचे ते एकमात्र परिमाण नव्हे. भारतात आज लाखो स्त्रिया ग्रामीण भागात राहात आहेत आणि त्यांच्या जीवनमानाची पातळी मनुष्यजातीला लाजवेल अशी आहे. भारतात आज एकूण मजुरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये सर्वात मोठी संख्या शेतमजुरी करणाऱ्या स्त्रियांची आहे, त्यामुळे तिचा दर्जा व तिची होणारी पिळवणूक हा भारतीय स्त्रीच्या दर्जाचा सर्वात मोठा मानदंड ठरतो. १९८१ च्या जनगणनेत असे आढळून आले की स्त्रियांची लोकसंख्या २५ कोटी ६० लाख असून त्यापैकी ८० टक्के स्त्रियांचा उदरनिर्वाह शेतीवर होतो. ह्यापैकी १ कोटी ५० लक्ष स्त्रिया जमीनमालक म्हणून दाखवल्या असल्या तरी व्यावहारिक पातळीवर कमाल जमीनधारणा कायद्याचा भंग करण्यासाठीच त्यांचे नाव लावलेले असते. अन्यथा प्रत्यक्षात जमिनीपासून मिळणाऱ्या फायद्यात त्यांचा वाटा जवळजवळ नसतोच. ह्यात्र-

बरोबर असेही आढळून आले आहे की शेतमालकांमधले ( कल्टिव्हेटर्स ) त्यांचे प्रमाण झपाट्याने घसरत चालले असून शेतमजुरांमधले त्यांचे प्रमाण वाढले आहे. कनिष्ठ व गरीब शेतकऱ्यांकडून मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांकडे जमिनीच्या हस्तांतरणाची जी जबरदस्त प्रक्रिया गेल्या काही वर्षांत घडून आली आहे, त्याचा सरळ सरळ परिणाम शेकडो गरीब शेतकऱ्यांचा शेतमजूर, मदतनीस म्हणून वापर करण्यात झाला आहे. पण त्यातही स्त्री-मजुरांना पुरुष मजुरांपेक्षा कमी वेतन मिळते. किमान वेतनाचा कायदा नाही. त्यामुळे सर्व काही स्थानिक जमीनमालकांच्या मर्जीवर. शिवाय वर्षभर काम मिळेलच ह्याचा भरवसा नाही. काही ठिकाणी तर दिवसभराच्या श्रमाचे २ किंवा ३ रुपये मिळतात.

शेतावरल्या मजुरीव्यतिरिक्त कुटुंबाचा गाडा चालवण्याची जबाबदारी तिचीच. त्यात पाण्यासाठी कोस न् कोस दूर जाऊन पाणी आणणे; जळण, लाकूडफाटा गोळा करण्यासाठी वणवण भटकणे आणि हे करत असताना गावगुंडांच्या पाशवीपणाची शिकार होणे ( तशात ती दलित, हरिजन असेल तर आगीत आणखी तेल ) हा तिच्या जीवनक्रमाचा अविभाज्य भाग आहे घरकामासाठी खर्च होणाऱ्या तिच्या श्रमाचे ना मोज ना माप. काही कुटुंबांकडे छोटासा जमिनीचा तुकडा असला तरी त्याची सामूहिक मालकी पतीपत्नीची नाही. त्यामुळे पतीच्या निधनानंतर तर त्या विधवेचे हाल विचारायलाच नकोत. जे काही छोटेमोठे तिच्या मालकीचे असेल ते हडप करायला मिळावे म्हणून अलिकडेच बिहारच्या एका खेड्यात एका विधवेला डाकीण, हडळ म्हणून जाहीर करण्यात आले. गाव तिला गावाबाहेर घालवून द्यायला निघाला होता. शेजारच्या गावातील महिला समितीच्या कार्यकर्त्यांना बातमी मिळून त्यांनी वेळीच हस्तक्षेप केला म्हणून बाईचे पुनर्वसन झाले. पण अशा प्रकारे वेळीच मदत सर्व जणींना थोडीच मिळणार आहे ?

ग्रामीण महिलांच्या आरोग्यविषयक संशोधनातून जाहीर झालेले निष्कर्ष भयावह आहेत. बालमृत्यूतील मुलींचे प्रमाण वाढत आहे. गर्भवती महिलांच्या मृत्यूचे प्रमाणही ग्रामीण क्षेत्रात शहरी क्षेत्रापेक्षा अधिक आहे अर्थात ह्याची कारणे अनेक आहेत. मुलीकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोण तर आहेच पण गरिबी, बेरोजगारी, वाढती महागाई, घरकामाचा बोजा, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अज्ञान, जातीयतेचा व धार्मिकतेचा पगडा, सरकारी विकास-योजनांवरील स्थानिक शासकवर्गाचा पगडा व त्यातून निर्माण होणारा भ्रष्टाचार इत्यादी सर्वांचा ग्रामीण स्त्रीच्या आरोग्यावरच नव्हे तर तिच्या अस्तित्वावरच भयानक परिणाम होत आहे. सरकारी, निमसरकारी व बिगरसरकारी संशोधनांमधून प्रसिद्ध झालेली आकडेवारी ह्याची साक्ष आहे.

अलिकडील काही काळात बऱ्याच राज्यांमधे शेतीचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. परंतु शेती उत्पादन वाढवणाऱ्या शेतीच्या नव्या औजारांना चालवण्याची कुशलता स्त्रियांना शिकविली जात नाही, त्यामुळे शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या

शेतीच्या जुनाट मेहनती कामापासून त्यांची सुटका नाही. अनेकदा तर त्यांना नवी औजारे आली की कामावरून काढले जाते. त्यामुळे अधिकाधिक प्रमाणात त्यांना घरबसल्या उद्योग करावे लागत आहेत. पण ह्या उद्योगामध्ये नियमित मिळकत व नियमित कामाचा पुरवठा दोन्हींचा अभाव असतो. शिवाय कामाचा अथवा कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या दलालाच्या मर्जीवरच त्यांचे जीवन अवलंबून असते. जुने सरंजामी उत्पादसंबंध फारसे बदललेले नाहीत व नव्या आधुनिक उत्पादन संबंधांमुळे होणाऱ्या फायद्यांमधेही भागीदारी नाही अशा दुहेरी पकडीत आजची ग्रामीण भारतीय स्त्री सापडली आहे.

परंतु ह्या पर्वतप्राय अडचणींसमोर ग्रामीण महिला हात टेकून स्वस्थ बसलेल्या नाहीत. अगदी मागासलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या बिहार राज्यापासून ते महाराष्ट्रासारख्या पुढारलेल्या राज्यापर्यंत लहान-मोठ्या सर्व पातळ्यांवर लढे उभे राहिलेले आपल्याला दिसून येतील. अलिकडील काळात तर शेतमजुरीसाठी किमान वेतन, समान कामासाठी समान वेतन, जमिनीचे फेरवाटप, जमिनीची संयुक्त मालकी वगैरे मूलभूत मागण्यांसाठी हजारोंच्या संख्येने शेतमजूर स्त्रिया रस्त्यावर येत आहेत. महाराष्ट्रातल्या ' जेल भरो ' आंदोलनात स्त्रियांनी किती मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता हे आपल्या परिचयाचे आहेच.

ग्रामीण भागाकडून शहरी क्षेत्राकडे वळले तरी चित्र फारसे वेगळे नाही. अडचणींचे स्वरूप, राहणीमान ह्यात बदल दिसला तरी ग्रामीण व शहरी स्त्रीच्या दर्जात तसा गुणात्मक फरक फारसा नाही. वरवर पाहता शहरातली राहणी थोडी आधुनिक, सुधारलेली दिसते. त्यामुळे शहरी स्त्रीचा चटपटीतपणा, बोलकेपणा, धीटपणा ह्यावरून तिच्यासंबंधी गैरसमज निर्माण होतात; कधी तर मुद्दाम केले जातात. पण गेल्या दहा वर्षात हुंडा पद्धतीने जे भस्मासुराचे स्वरूप धारण केले आहे, त्याच्या थोडेसे जरी खोलात गेले तरी आज कुटुंबांत व समाजात स्त्रीला काय स्थान आहे ह्याचा अंदाज येईल. हुंडाबळींचे प्रमाण जसजसे वाढत आहे, तसतसे त्याला विरोध करण्यास अनेक जणी व अनेक संस्था, संघटना पुढे येत आहेत. सर्वांचेच कार्य मोलाचे आहे; परंतु मी सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे आमच्या संघटनेचा ह्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोण व त्या संदर्भात आम्ही करत असलेले कार्य एवढ्यापुरतेच मी माझे विवेचन मर्यादित ठेवणार आहे.

## स्त्रियांवरील अत्याचारांविरुद्ध संघर्ष

१९८१ साली आमच्या संघटनेची स्थापना झाली तेव्हा आमच्या दिल्ली शाखेसमोर सर्वात पहिला आणि सर्वात ज्वलंत प्रश्न उभा राहिला तो हुंड्याचा. रोज वर्तमानपत्रातून २/३ तरी स्त्रिया जळून मेल्याच्या बातम्या येत होत्या. कारण बहुधा एकच. स्वयंपाक करताना किंवा बाळाचे दूध गरम करताना स्टोव्हचा भडका झाल्याचे निमित्त.

हॉस्पीटल्सच्या 'बर्न्स वॉर्ड'मधे जरा अधिक खोलात चौकशा केल्या की कळायचे, बाईचे वय सहसा १६ ते ३० ह्या वयोगटातले असायचे. थोडक्यात, नवीनच लग्न झालेले. माहेरच्यांची गाठ घेतल्यावर कळायचे की त्यांनी कुवतीपेक्षा खरं तर जास्तच हुंडा दिला होता; पण सतत काहीतरी दडपण आणून अधिक वस्तू अथवा रोख रक्कम मागितली जात होती. ह्या सर्व प्राथमिक माहितीतून संशय बळावत गेले आणि खात्रीच पटू लागली की हा स्टोव्हचा अपघात नव्हे. पोलिस रेकॉर्ड पाहणीतून कळले की बहुतेक केसेस अपघात अथवा आत्महत्त्या ह्या नावाखाली दाखल आहेत. म्हणजे चुकूनमाकून बाई जगलीच तरी आत्महत्येचा प्रयत्न केल्याने अपराधी तीच. पोलिस आणि तिचे मारेकरी ह्यांचे माथे उजळ. नवरदेव पुनः लग्न करायला आणि नव्याने हुंडा हडप करायला पुनःश्च उभे. १९६१ मधे एक हुंडाविरोधी कायदा झाला होता त्याची काही मदत मिळते का म्हणून कोर्टाकडे धाव घेतली तर त्या कायद्याची अक्षमताच लक्षात आली.

अशा परिस्थितीत अखिल भारतीय स्वरूप असणाऱ्या दिल्लीतील काही प्रमुख महिला संघटनांनी एकत्र यायचे ठरवले. आणि सामाजिक पातळीवर निदान ह्या विषयाला तोंड फोडण्याइतकी जागृती आणि सरकारी पातळीवर प्रत्यक्ष हुंड्याच्या केसेस हाताळत असता येणाऱ्या अडचणींचे निवारण होण्यासाठी काही किमान कायदेशीर तरतुदींसाठी लढायचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. आणि 'दहेज विरोधी चेतना मंच' ही संयुक्त आघाडी उभी राहिली. अखिल भारतीय पातळीवरचे जवळपास सर्व सरकारी निर्णय दिल्लीतूनच होतात व लोकसभा पण दिल्लीतच असल्याने दहेज विरोधी चेतना मंचच्या कार्याला हुंडाविरोधी चळवळीत एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. लोकसभेमधे त्यावेळी सदस्य असलेल्या श्रीमती सुशीला गोपालन, गीता मुखर्जी आणि प्रमिला दंडवते ह्यांनी लोकसभेत वरचेवर आवाज उठवून लोकसभा सदस्यांची एक जॉइंट सिलेक्ट कमिटी नेमावयास सरकारला भाग पाडले. ह्या कमिटीने सर्व भारतभर हिंडून हुंडा पद्धतीचे वेगवेगळ्या प्रांतात, जातीमधे व धर्मामधे असलेले स्थान व त्याचा स्त्रीच्या कुटुंबांतर्गत दर्जावर होणारा परिणाम ह्याची पाहणी केली. तसेच हुंड्यासाठी छळ करणाऱ्यांना शिक्षा व्हावी म्हणून काय कायदेशीर तरतुदींची आवश्यकता आहे, ह्याचाही अभ्यास केला व हुंडाविरोधी विधेयकासाठी मसुदा तयार केला. ह्या कमिटीचे हे पाहणीकार्य चालू असतानाच दिल्ली शहरात दहेजविरोधी मंचने पत्रके काढून, जागोजागी गल्लीकोपऱ्यात सभा भरवून, तसेच समाजातल्या प्रतिष्ठित, बुद्धिवादी, विविध व्यवसायात असणाऱ्या पांढरपेशांची सभा-संमेलने भरवून, वृत्तपत्रे आणि नियतकालिकामधे लेख लिहून, कॉलेज विद्यार्थ्यांचे मेळावे भरवून ह्या प्रश्नाला समाजाच्या सर्व थरांमधे वाचा फोडली.

जवळ जवळ तीन वर्षे ह्या प्रश्नावर फक्त दिल्लीतच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानभर असंख्य संघटनांनी हुंड्याच्या प्रथेविरुद्ध आवाज उठवला. परंतु लोकसभेच्या प्रत्येक अधिवेशनात, पुढील अधिवेशनाचे आश्वासन देऊन प्रश्नाला बगल देण्यात आली.

अखेर १९८४ च्या पावसाळी अधिवेशनात दिल्लीतल्या स्त्रियांनी, कामगार संघटनांनी आणि विद्यार्थी, शिक्षक संघटनांनी एक प्रचंड मोर्चा लोकसभेवर नेला. तरीही अधिवेशनाच्या अखेरीपर्यंत विधेयक चर्चेस येण्याचे लक्षण दिसेना, तेव्हा स्त्रियांनी पार्लमेंटबाहेर रस्त्यावर ठाण मांडून बसण्याचे ठरवले. पोलिसांना सूचना न देता अचानक पार्लमेंटच्या बाहेरील रस्त्यावर स्त्रिया थव्याथव्याने गोळा झाल्या आणि रस्त्यावर बसून सर्व रहदारी बंद पाडली. त्याच वेळी ह्या प्रश्नाचे समर्थन करणारे विविध विरोधी पक्षांचे पार्लमेंटचे सदस्यही सभागृहाचा त्याग करून सरकारचा निषेध करत बाहेर पडले व त्यांनी रस्त्यावर बसलेल्या स्त्रियांपुढे पाठिंबादर्शक भाषणे केली. या कार्यक्रमाचा खूपच बोलबाला झाला आणि सरकारवर प्रचंड दडपण आले. अखेरीस हुंडाविरोधी विधेयक चर्चेला येऊन पास झाले. ह्या विधेयकाच्या निमित्ताने भारतीय दंडसंहितेतील अनेक त्रुटींवरही चर्चा झाली; कारण ह्या त्रुटींमुळेच तर स्त्रीवर अन्याय करणाऱ्या-विरुद्ध कारवाई करण्यास पोलिस कानाडोळा करू शकत होते. परंतु स्त्री संघटनांच्या जबरदस्त दडपणामुळे १९६१ च्या हुंड्यासंबंधीच्या कायद्यामध्ये १९८४ मध्ये एकदा व १९८६ मध्ये एकदा थोडीफार सुधारणा करण्यात आली. ह्या विधेयकामुळे मिळालेल्या कायदेशीर तरतुदींवर आणि अद्यापही राहून गेलेल्या त्रुटींवर एक स्वतंत्र लेखच होऊ शकेल.

ह्या संयुक्त व्यासपीठावरून काम करत असतानाच आमच्या संघटनेच्या दैनंदिन कार्याचा भाग म्हणूनही केवळ हुंडाविरोधीच नव्हे तर स्त्रीवर जे स्त्री म्हणून कुटुंबांतर्गत व कुटुंबाबाहेरही अत्याचार होत असतात, त्याविरुद्ध संघटना सतत कार्यरत असते. गेल्या काही वर्षांत वाढलेल्या अत्याचाराचे प्रमाण लोकसभेस सादर केलेल्या काही आकड्यांवरून स्पष्ट होईल. १९८५ मध्ये संपूर्ण देशात पोलिसांकडे रजिस्टर झालेल्या बलात्काराच्या ६१८९ केसेस होत्या. म्हणजे स्थूलमानाने दर दिवशी १७ स्त्रिया ह्या अत्याचाराला बळी पडतात. ह्यापैकी खुद्द पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट ह्या संस्थेने कबूल केल्याप्रमाणे ९७% बलात्काराच्या केसेस रद्द तरी केल्या जातात अथवा गुन्हेगाराचा शोध लागत नाही म्हणून परत पाठवल्या जातात. १९८५ मधे हुंडाबळीच्या ८३७ केसेस होत्या; तर १९८६ मधे त्या १३१९ पर्यंत वाढल्या. खुद्द दिल्लीत गेल्या सहा महिन्यांत ३५० हुंडाबळीच्या केसेस झाल्या. म्हणजे आज देशाच्या राजधानीत दर १२ तासाला एक नववधू हुंड्याच्या त्रासापायी जळून मरत आहे. ह्या वाढत्या अत्याचाराविरुद्ध लढण्याचे काम हा आमच्या नित्याच्या कार्याचा भाग होऊन बसला आहे. ह्या कार्याचा प्रमुख भाग म्हणजे व्यक्तिगत पातळीवर अडचणीत असलेल्या स्त्रियांना कायद्याचा सल्ला देणे, त्यांचे मनोबल वाढवून त्यांना खंबीरपणे लढण्यास तयार करणे व केसच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना मदत करणे. ह्याच कामाचा व्यापक भाग म्हणजे वस्तीपातळीवर जिथे जिथे आमची युनिटस आहेत, तिथे ह्या संदर्भात चर्चा करणे; वस्ती वरील एखादी स्त्री अडचणीत असल्यास इतरांना संघटितपणे तिच्या मदतीसाठी उभे करणे;

वेळोवेळी गल्लीकोपऱ्यावरील सभा, मोर्चे, निदर्शने इत्यादींचे आयोजन करणे; सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे हुंडा, सती इ. क्रूर प्रथांचे सामाजिक व राजकीय पैलू उलगडून दाखवणे व जे घटक ह्या परिस्थितीस जबाबदार आहेत त्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी स्त्रियांची मानसिक तयारी करणे. कधी रोज दारू पिऊन मारणाऱ्या नवऱ्याला वठणीवर आणण्यासाठी गल्लीतल्या इतर सर्व कुटुंबांना—स्त्री-पुरुष सर्वच त्यात आले, एकत्रित करून नवऱ्यावर सामाजिक दबपण आणावे लागते. खूपदा एवढा डोस पुरेसा होतो. पण काही नाठाळांना पोलिस चौकी दाखवावीच लागते. कुणाची कायम नोकरी असल्यास वरिष्ठाद्वारे आणलेले दडपण उपयुक्त होते. पण वरिष्ठही नवऱ्यास सामील असल्यास मग मात्र स्त्रीची मंजुरी घेऊन कोर्टाचे द्वार ठोठावेच लागते. परिस्थितीनुरूप पोटगीचा अथवा घटस्फोट व पोटगीचा असा दावा करावा लागतो. एखाद्या स्त्रीला जाळून अथवा अन्य प्रकाराने मारण्यापर्यंत प्रकरण गेले असेल तर पोलिसांवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागते. ह्यात शेजाऱ्यापाजाऱ्यांसकट सर्वांना महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. गुन्हेगार व पोलिस दोघांनाही ह्याचे महत्त्व चांगलेच माहीत असल्याने शेजाऱ्यांना गोंधळात पाडणे, त्यांना फूस लावणे, केसशी प्रत्यक्ष संबंध नसलेले धर्म, जाती वगैरे प्रश्न उपस्थित करणे इ. प्रयत्न सतत केले जातात व केस कमजोर होते अथवा मूळ प्रश्नालाच बगल मिळते. छोट्या छोट्या वस्त्यात राहाणाऱ्या शेजाऱ्यांना खरं तर सगळं काही इत्थंभूत माहीत असतं; पण वेगवेगळ्या दडपणांमुळे ते बोलायला तयार नसतात. अशा वेळी झालेल्या अन्याया-विरुद्ध त्यांच्या मनात पुरेशी चीड निर्माण करणं तसंच पोलिसांसमोर किंवा कोर्टात धैर्याने जबानी देण्यासाठी त्यांना तयार करणं हे एक महत्त्वाचे काम ठरते.

एकदा एका नऊ वर्षांच्या मुलीवर ती धुण्याभांड्याचं काम करायला गेली असताना मालकाच्या २५ वर्षांच्या मुलाने बलात्कार केला. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी तिचा आरडाओरडा ऐकून घराला बाहेरून कडी लावून पोलीस बोलावले. मुलाचे वडील त्या भागातले मातब्बर गृहस्थ. त्यामुळे संध्याकाळी घरी येताच त्यांनी मुलाला सोडवून आणलेच पण नंतरच्या दिवसात शेजाऱ्यापाजाऱ्यांना भरपूर पैशांची लालूच दाखवली. त्या छोट्या पोरीची आई झोपडीत राहाणारी आणि विधवा. पण आमची सादस्य. आमची संघटना तिच्या बाजूने उभी राहिली आणि शेजाऱ्यांशी सतत संपर्क ठेवून त्यातील दोन कुटुंबांना आपल्या मूळ जबानीलाच चिकटून राहण्याविषयी सतत सल्ला देऊन त्यांचे मनोधैर्य टिकवण्यासाठी मदत केली. कोर्टातले पब्लिक प्रॉसिक्यूटर ज्या ढिलाईने काम करत होते त्यावर कडक नजर ठेवली. मुलीची साक्ष ' इन कॅमेरा ' घेण्यास न्यायधीशांना भाग पाडले व अखेर केस जिंकली. बलात्काराविरुद्ध अशा पहिल्या अनुभवानंतर कितीतरी केसेसमधे आम्हाला यश आले आहे. पण जिथे शेजाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही तिथे माघार घेण्याची वेळसुद्धा येते. अनेकदा आई, वडील अथवा भाऊ असे मुलीच्या घरचे लोकच मधल्या-मधे अवसान गाळून बसतात. त्यांचीच हिम्मत गळल्यावर आपण कितीही प्रयत्न केला तरी केसमधली जानच निघून जाते. ह्याउलट त्यांचा निश्चय आणि संघटनेचे प्रयत्न

ह्यांची जोड मिळाल्यास एखाद्या जुन्या, पोलिसांनी दुर्लक्ष केलेल्या केसलासुद्धा पुनरुज्जीवन मिळते.

एकदा एका नवविवाहितेला तिच्या नवऱ्याने व चुलतसासूने जाळून मारले. त्या वस्तीत हे कुटुंब नव्यानेच राहायला गेलेले त्यामुळे शेजाऱ्यांशी फारसा संबंध नव्हता. मुलीचे आईवडील मथुरेला. त्यामुळे त्यांना कळून ते येईपर्यंत पंचनामा, पोस्टमार्टेम सर्व काही झालेले व पोलीसांनी सोयिस्करपणे आत्महत्येची केस केलेली. आई-वडिलांना खात्री की हा खून आहे पण कितीही समजावून सांगितले तरी पोलीस ऐकेचनात. ३-४ महिने मथुरेहून विचाऱ्यांनी सतत हेलपाटे घातले. अखेर कोणीतरी सांगितल्यावरून आमच्याकडे आले. १९८६ मधे अपराध संहितेत झालेल्या तरतुदीनुसार लग्नाच्या ७ वर्षांच्या आत जर संशयास्पद अवस्थेत एखाद्या महिलेचा मृत्यू झाला असेल तर त्याची खून समजूनच विशेष चौकशी करावी लागते. पण ह्या आदेशाचे पोलिसांनी पूर्ण उल्लंघन केले होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत हे प्रकरण नेऊन ही तरतूद त्यांच्या नजरेस आणून दिल्याबरोबर केसचे पारडेच फिरले, आई-वडिलांच्या जबानीनुसार नवऱ्याला व सासूला तात्काळ अटक करावी लागली आणि केस पद्धतशीररीत्या कोर्टात चालू झाली. इंडियन पीनल कोडच्या सेक्शन ४०५ आणि ४०६ च्या तरतुदीनुसार व सुप्रीम कोर्टाने स्त्री-धनाच्या केलेल्या व्याख्येनुसार नवऱ्यास सोडून परत आलेल्या स्त्रियांना त्यांचे स्त्रीधन परत देववणे हा तर आमच्या नैमित्तिक कार्याचा एक भागच होऊन बसला आहे.

## श्रमिक म्हणून स्त्रियांचे लढे

परंतु स्त्रियांवर त्यांच्या स्त्रीत्वामुळे होणाऱ्या अत्याचारांपुरतीच त्यांच्या हलाखीची मर्यादा असती तर आत्तापर्यंत नमूद केलेल्या क्षेत्रात काम करून भागले असते. आज हजारो स्त्रिया मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करत आहेत. खरे तर आर्थिक स्वातंत्र्याची गरज आज प्रत्येक स्त्रीला प्रकर्षाने वाटत आहे. किंबहुना हजारो वर्षांच्या गुलामगिरीचे जोखड स्त्रियांना उखडून टाकायचे असेल तर प्रथम तिला आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहाता आले पाहिजे. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे ह्या बाबतीतले रेकॉर्ड मन अस्वस्थ करणारे आहे. महिला दशकाच्या अखेरीस जी आकडेवारी प्रसिद्ध झाली तिच्यानुसार देशातल्या एकूण कामकऱ्यांपैकी फक्त एकअष्टमांश संघटित क्षेत्रात होते आणि ह्यापैकी स्त्रियांचा सहभाग फक्त १२·४ टक्के होता. असंघटित क्षेत्राची आकडेवारी सहसा अचूक मिळणे अवघड असते. कारण हजारो स्त्रिया घरकामाबरोबरच अल्पशा प्रमाणात जे अर्थार्जन करतात त्याचे मोजमाप करणे अवघड आहे. आज एकूण मजुरी करणाऱ्या स्त्रियांत ७३ टक्के स्त्रिया असंघटित क्षेत्रात काम करताहेत. ह्या कामात प्रचंड प्रमाणात असुरक्षितता, अनियमितपणा, कमी वेतन, किमान वेतनाचे बंधन नाही; तसेच वेळाचेही बंधन नाही अशी परिस्थिती

असल्याचे आता सर्वांनाच ठाऊक आहे. गेल्या काही वर्षात वाढत्या आधुनिकीकरणामुळे व यांत्रिकीकरणामुळे पारंपरिक ज्यूट, काथ्या, तंबाखू इ. उद्योगांमधील स्त्रियांची हकालपट्टी वाढत्या प्रमाणात करण्यात आली आहे. मुळात त्यांना अकुशल कामगार म्हणूनच घेण्यात येते. त्यात कामाला लागल्यावर पुढील प्रशिक्षण आणि बढतीची संधी जवळपास नाहीच. त्यामुळे कपातीची वेळ आली की पहिला बळी तिचाच जातो. इकडे वाढत्या महागाईमुळे कुटुंब इतके घायकुतीला आलेले असते की काहीतरी अर्थार्जन करणे आवश्यक होऊन बसते. मग घरबसल्या उद्योगाकडे ती वळते. ह्या क्षेत्रात होणाऱ्या शोषणाचे प्रमाण तर कल्पनेपलीकडे आहे. इथे वेतन नावाचा प्रकार नाहीच. पैसे नगागणिक मिळणार. कुटुंब चालवण्याच्या रगाड्यात स्वतः काम मिळवणे शक्य नाही. त्यामुळे ह्या क्षेत्रात दलालांचा जबरदस्त सुळसुळाट. मुळात मालक नगागणिक कमीच मजुरी देतात. त्यातही दलालांचा हिस्सा जवळजवळ ४०% इतका प्रचंड. त्यामुळे घरकामाव्यतिरिक्त ८ ते १० तास काम करूनही मेहनत करणारीला दिवसाकाठी जास्तीत जास्त ४ ते ५ रुपये मिळतात. ह्यात अनेकदा मुलांच्या मेहनतीचा पण वाटा असतो. संघटित क्षेत्रातल्या स्त्रियांची परिस्थिती थोडीशी बरी म्हटली तरी त्यांच्यावरही घरकाम व नोकरी दोन्हीचे प्रचंड दडपण असते. घरी परंपरेने लादलेली आई, पत्नी, सून इत्यादी भूमिका निभावावी लागतेच. त्याखेरीज नोकरीची धावपळ, कामाच्या जागी अनेकदा पुरेसा उजेड, स्वच्छता, विश्रांती-कक्ष, बाथरूमची सोय व मुख्य म्हणजे पाळणाघर इ. अनेक सोयींचा अभावच असतो. अनेकदा घातक रसायने व इतर शारीरिक इजा पोचवणाऱ्या वस्तूंना हाताळावे लागते व त्याचा आरोग्यावर घातक परिणाम होतो. पण एवढ्या सर्व अडचणी असूनही आज स्त्रिया अर्थार्जनाचे मार्ग सतत धुंडाळत आहेत. कोणत्याही प्रश्नावर चर्चा करायला जा, सर्व प्रांतांच्या, सर्व जातिधर्मांच्या आणि वयाच्या स्त्रियांची मागणी एकच—"आम्हाला नोकरी शोधून द्या." बेकारीचा प्रश्न पूर्वी कधीही नव्हता एवढा अलिकडील वर्षात भयानक झाला आहे.

ह्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी आणि कामगार महिलांचे दुःख चव्हाट्यावर आणण्यासाठी आमचे सतत प्रयत्न चालू असतात. ज्या ठिकाणी लोकशाही तत्त्वांना मानणाऱ्या आणि मजुरांच्या हिताचे वर्गीय दृष्टिकोनातून रक्षण करणाऱ्या मजूर संघटना आहेत, त्या ठिकाणी स्त्रियांच्या विशेष अडचणी युनियनच्या मुख्य मागण्यांबरोबर जोडल्या गेल्या पाहिजेत. ह्यासाठी युनियनबरोबर सतत संवाद साधला जात असतो. समान कामासाठी समान वेतन आणि पाळणाघराची मागणी, ह्या दोन मागण्यांवर आम्ही अनेक संघर्ष केले आहेत. बेकारीच्या प्रश्नावर स्त्रियांना संघटीत करणे हाही आमच्या दैनंदिन कामाचा अविभाज्य हिस्सा आहे. घरबसल्या उद्योग करणाऱ्या स्त्रियांना संघटित करता यावे म्हणून त्यांच्या परिस्थितीची आम्ही पाहणी केली व त्यातूनच त्यांच्या जबरदस्त शोषणाची कल्पना आली. परंतु त्यांचे शोषण जितके प्रचंड आहे, तितकेच

त्यांना संघटित करणेही अवघड आहे. हाच प्रकार घर-बांधणी मजुरांचा व मोलकरणींचा. मुळात संघटनेची कल्पनाच गळी उतरत नाही व उतरल्यास त्यात येणाऱ्या अडचणी अनेक. परंतु ह्या संदर्भातल्या त्यांच्या जाणीवांच्या कक्षा रुंदावण्याचे काम झपाट्याने वाढत आहे.

## नागरिक या नात्याने स्त्रियांनी केलेले लढे

ह्या खेरीज, एक नागरिक म्हणून होणारी स्त्रियांची ससेहोलपट काही कमी नाही. पाण्याचा अभाव ही खेडोपाडीच नव्हे तर शहरातही एक प्रचंड डोकेदुखीची बाब होऊन बसली आहे. सार्वजनिक नळावर तासन् तास रांगा लावून बसलेल्या स्त्रियांचे दृश्य सर्वांना परिचित आहे. पाणी आल्यावर एकमेकींचे डोके फुटेपर्यंत होणारी भांडणेही अनेकांनी पाहिलेली आहेत. जिथे स्वतंत्र नळ आहेत त्यांनादेखील पुरेसे पाणी मिळत नाही, तिथे सार्वजनिक नळावर मिळणारे पाणी कितपत आणि कोणाला पुरणार ! अशा परिस्थितीत एखाद्या विशिष्ट वस्तीत असलेल्या पाणी-वितरण पद्धतीचा अभ्यास करून स्थानिक म्युनिसिपालिटी अथवा कॉर्पोरेशनचे अधिकारी आणि ह्या संस्थांवर निवडून गेलेले प्रतिनिधी ह्यांच्या विरोधात स्त्रियांना संघटित करावे लागते. पाण्याचा प्रश्न असा आहे की ह्या अडचणीसाठी स्त्रिया चटकन लढायला तयार होतात. पण त्याचबरोबर हेही खरं आहे की एखादा मोर्चा, घेराव वगैरेमुळे तात्काळ थोडी सवलत मिळते. अर्थात हेही खरेच की थोड्याच दिवसात येरे माझ्या मागल्या सुरू होते. त्यामुळे ह्या प्रश्नावर कितीही वेळा लढले तरी कमीच होते.

पाण्यासारखाच जिवंत प्रश्न रेशनचा. मुळात लाच दिल्याखेरीज रेशनकार्ड पदरात पडणे फारच अवघड. एकटी-दुकटीचा तर टिकाव लागणेच कठीण. अगदी संघटीत होऊन गेले तरी काम वेळेवर होईल ह्याची शाश्वती नसते. कारण मलिदा मिळणार नाही ह्याची संबंधित कर्मचाऱ्यांना खात्री असते. मग फॉर्म्स् संपले आहेत इथपासून त्रास द्यायला सुरुवात होते. लाच दिल्यास एका दिवसात होणाऱ्या कामास दहा-दहा पंधरा-पंधरा खेटे घालावे लागतात. एवढ्या काळात लढण्याची शक्ती टिकण्यापेक्षा मनोधैर्य खचण्याचीच शक्यता अधिक. ज्या विभागात संघटनेच्या कामाचा बोलबाला आहे त्या विभागात कर्मचाऱ्यावर दडपण आणणे थोडे सोपे होते. कार्ड मिळाल्यानंतर दुसरी कटकट म्हणजे रेशन दुकानामधली धांदलेबाजी. इथेही तत्व तेच. एकटी दुकटीचा टिकावच लागत नाही. संघटित प्रयत्नांना मात्र बरेच यश येते. पण रेशन दुकानदाराविरुद्ध लढण्यासाठी पाऊले बरीच काळजीपूर्वक उचलावी लागतात; कारण छोट्या-छोट्या वस्त्यांमधले दुकानदार हे बरेचदा त्याच वस्तीत राहणारे असतात आणि आपल्याच सदस्यांपैकी कोणाच्या तरी जवळच्या नात्यातलेच असण्याची शक्यता असते. म्हणून त्यांच्याविरुद्ध जायला वस्तीतले लोक एकदम धजावत नाहीत. अशा वेळी लढाई व्यक्तिशः त्याच्याविरुद्ध नसून वरपासून खालपर्यंत चालत आलेल्या भ्रष्टाचाराच्या

शाळलीतला तोच शेवटचा दुवा असल्याने त्याच्यापासून सुरुवात करून एकूणच सर्व यंत्रणेशी लढण्याची ही तयारी असल्याचे समजावून सांगावे लागते. कधी कधी धान्याच्या अनियमित व निकृष्ट प्रतीच्या पुरवठ्यासंबंधी रेशन दुकानदाराची तक्रारसुद्धा वाजवी असते. तेव्हा तोही आमच्या लढ्यात सामील होतो, निदान आमच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवितो.

सर्व अडचणी बाजूला सारून धैर्याने लढणाऱ्या स्त्रियांचे पेकाट मोडण्याचे काम गेली काही वर्षे अवाच्या सवा वाढलेली महागाई करत आहे. महागाईच्या भस्मासुराला तोंड स्त्रियांनाच द्यावे लागते. घरात येणाऱ्या तुटपुंज्या अन्नधान्याचा आणि इतर गरजेच्या वस्तूंचा सर्वांना पुरवठा करता करता अनेक स्त्रियांना स्वतः उपाशी राहण्याची पाळी येते. परिणामी त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो; पण करणार काय? एकेकटीने लढून महागाई थोडीच कमी होणार आहे? शिवाय महागाईचा प्रश्न अनेक सरकारी धोरणांशी जोडलेला आहे. तेव्हा त्या सर्वांचे आकलन करून घेऊनच महागाईविरुद्ध लढा उभा करायला हवा. महाराष्ट्रात महागाईविरुद्ध संयुक्त महिला समिती गेली कित्येक वर्षे कार्यरत आहे. परंतु दिल्लीतही आमच्या संघटनेने कधी स्वतंत्रपणे तर अलिकडील काळात संयुक्तपणे ह्या प्रश्नावर एकीकडे जनजागृतीचे, प्रामुख्याने महागाईच्या प्रश्नाला सरकारच्या आर्थिक धोरणाबरोबर जोडून ते लोकांसमोर मांडण्याचे व दुसरीकडे मोर्चा व सत्याग्रहामार्फत आपला निषेध सरकारकडे नोंदवण्याचे कार्य अविरत चालू ठेवले आहे.

ह्याखेरीज वस्ती-पातळीवर सफाई, आरोग्यकेंद्रांमध्ये असणाऱ्या गैरसोयी, सरकारी व म्युनिसिपल शाळांमधील गैरसोयी, वाहन व्यवस्थेतील गैरसोयी, सरकारी योजना राबवताना राजकीय फायद्यांसाठी केलेले पक्षपात, शौचालयांचा अभाव इत्यादी अनेक प्रश्नांमुळे स्त्रियांचे दैनंदिन आयुष्य अतिशय कटकटीचे झालेले आहे. त्यामुळे ह्या प्रश्नांवर संघटनेला सतत लढे उभे करावेच लागतात. पदरी पडलेल्या कटकटी हा आपल्या नशिबाचा भाग नसून ह्या परिस्थितीविरुद्ध आपण एकत्र लढलो तर परिस्थितीत बदल घडवून आणता येतात, एवढी किमान जाणीव स्त्रियांमध्ये निर्माण होण्याचे आणि त्यातून लढाऊ कार्यकर्ते पुढे येण्याचे महत्त्वाचे कार्य ह्या छोट्या छोट्या संघर्षांमुळे होते.

परंतु नागरिक म्हणून स्त्रियांना येणाऱ्या अडचणी व त्यातून निर्माण होणारे प्रश्न फक्त वस्तीपातळीवरील गैरसोयींपुरतेच मर्यादित नाहीत. गेल्या काही वर्षांत अत्यंत सूक्ष्मपणे परंतु पद्धतशीररीत्या स्त्रियांच्या मूलभूत हक्कांवर, कधी कधी तर त्यांच्या जगण्याच्याच हक्कावर गदा येत आहेत. गर्भजल परीक्षेचा प्रश्न हा त्यातला महत्त्वाचा प्रश्न. महाराष्ट्र सरकारने त्या बाबतीत एक धाडसाचे पाऊल उचलले आहे ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु त्यामागे गेली कित्येक वर्षे स्त्री-संघटनांनी केलेला अविरत प्रचार व मेहनतच कारणीभूत आहे. दिल्लीमध्ये १९८२ साली प्रथम ह्या विषयावर जनमत तयार करण्या-

साठी प्रमुख स्त्री-संघटनांचे प्रतिनिधी, डॉक्टर्स, वकील, समाजशास्त्रज्ञ इ. अनेकांची एक सभा घेण्यात आली होती. डॉक्टर्सचे ह्या विषयावर प्रचंड दुमत होते. गर्भात काही विकृती तर नाही ना हे आजमावण्यासाठी आधुनिक वैद्यकशास्त्राने दिलेले गर्भजलपरीक्षा हे साधन खरं तर स्त्रियांसाठी वरदानच ठरायला हवे होते; परंतु झाले उलटेच. स्त्रीचा सामाजिक दर्जा तोवर एवढा घसरला होता की मुलगी असल्यास गर्भातच तिचा नाश करता यावा म्हणून ह्या परीक्षेचा उपयोग केला जाऊ लागला. पैशावर दृष्टी ठेवून प्रॅक्टीस करणाऱ्या काही डॉक्टर्सनी तर त्याच्या जाहिराती पण काढल्या. परंतु स्त्री-संघटनांच्या, ज्यात आमचा प्रमुख हिस्सा होता, योग्य वेळी केल्या गेलेल्या हस्तक्षेपामुळे पुढे जाहिराती जरी बंद पडल्या तरी गुपचुपपणे स्त्रीगर्भ पाडण्याचे प्रकार अद्यापही चालूच आहेत. महाराष्ट्र सरकारच्या चालीवर एक केंद्रीय विधेयक हवे अशी आमची मागणी आहे. गर्भजलपरीक्षेसारखेच ई. पी. फोर्टसारख्या औषधांनी स्त्रियांच्या आरोग्यावर आक्रमण केले आहे. ह्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा मोठाच स्वार्थी हात आहे. इतकेच नव्हे भारताच्या औषधविषयक धोरणावरच ह्या कंपन्यांचा मोठा पगडा आहे. सुधारलेल्या पाश्चिमात्य देशात बंदी असलेली औषधे अविकसित तिसऱ्या जगात बेधडक विकण्याचा व आपला नफा वाढवण्याचा उद्योग ह्या बहुराष्ट्रीय कंपन्या करत आहेत व त्यांना आपल्याचकडील एक प्रबळ गट ह्या उद्योगात स्वार्थी हेतूने मदत करीत आहे. परंतु दिल्ली सायन्स फोरमसारख्या विज्ञानाला वाहून घेतलेल्या आणि जागरूक संस्थांबरोबर सहकार्य करून ह्या विषयावर स्त्रियांमधे प्रचार करण्याच्या कामाबरोबरच ह्या औषधावर बंदी घातली जावी ह्या मागणीसाठी आमचे सतत प्रयत्न चालू आहेत.

## कायद्यातील सुधारणांसाठी चळवळी

स्त्रीच्या आरोग्याकडून तिला मिळणाऱ्या कायदेशीर हक्कांकडे वळले तरी चित्र फारसे बदलत नाही. १९८६ साली पास झालेल्या मुस्लिम महिला विधेयकामुळे मुस्लिम स्त्रियांच्या एका मूलभूत हक्कावर घाला घातला गेला व स्त्रियांच्या कायदेशीर हक्काचा प्रश्न काही शतके तरी मागे गेला. घटनेने मान्य केलेले समतेचे तत्व प्रत्यक्षात धुडकावून एकूण स्त्रीवर्गाला विषम वागणूक मिळत गेली व त्याविरुद्ध स्त्रिया जागरुकतेने लढण्याचा कसून प्रयत्न करत असतानाच धर्माच्या नावाखाली स्त्रियांच्या एकीमधे फूट पाडण्याचा आणि अनेक संघर्षाद्वारे स्त्रियांनी मिळवलेल्या एका अधिकाराला हिरावून घेण्याचा प्रयत्न ह्या विधेयकाने व ह्या निमित्त उठलेल्या गदारोळामुळे झाला. मुस्लिम स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आमच्या संघटनेचे अनेक कार्यकर्ते दिवसरात्र राबले आणि मुस्लिम तसेच हिंदू धर्मांधांना व त्यांच्या विषारी प्रचाराला त्यांच्या वस्त्यांमधे जाऊन धैर्याने तोंड देऊन स्त्रियांना ह्या विधेयकामागील कुटिल राजकारण समजावून सांगण्याचे काम केले. शहाबानो खटल्याच्या निकालानंतर हे प्रकरण जाणून-बुजून चिघळवले जाणार ह्याचा अंदाज आल्याने तावडतोब दिल्लीतील मुस्लिम महिलांचे

आम्ही संमेलन घेतले. ह्यात गरीब परिवारातील तलाकपीडित महिलांपासून ते मध्यम व पांढरपेशा समाजातील सुविद्य मुस्लिम महिलांनी भाग घेतला व सुप्रीम कोर्टाच्या निकालाचे मनापासून स्वागत केले. दिल्लीत झालेले मुस्लिम महिलांचे हे अशा प्रकारचे पहिलेच संमेलन. ह्यास विरोध करण्यास गुपचुपपणे काही महिलांना मुल्ला-मौलवींनी पाठवले होते. हा इस्लामवर हल्ला आहे असे त्यांना पढवून पाठवले होते. पण त्याचा इरादा आम्हाला वेळीच कळला व आमच्या स्वयंसेवकांनी त्यांना आवरले. मात्र त्यांना सभा संपेपर्यंत मुद्दाम थांबवून धरले आणि सभेनंतर इस्लामचा चांगला अभ्यास असणाऱ्या महिलांशी त्यांची चर्चा घडवून आणली. मग मात्र त्यांचा सर्वच नूर एकदम पालटला.

आणखीही एक असाच प्रसंग घडला. लोकसभेत विधेयक येणार हे कळल्यापासूनच जागोजागी सभा, पत्रके, मोर्चा इत्यादी अनेक पातळ्यांवर ह्या विधेयकाविरुद्ध आमचे काम जोरात चालू होतेच. जनजागरणाचा एक महत्वाचा भाग म्हणून मुस्लिम महिलांची एक अखिल भारतीय रॅली आम्ही केली. सबंध भारतातून जवळजवळ २००० मुस्लिम महिला आल्या होत्या. धर्ममार्तंडांविरुद्ध खंबीरपणे उभे राहून आपल्या दुःखाला वाचा फोडणारी मुस्लिम महिलांची अखिल भारतीय पातळीवरची ही एकमेव रॅली. ह्या रॅलीचा मूड बघून बेगम आबिदा अहमद व नजमा हेपतुल्ला ह्या दोन मुस्लिम काँग्रेस पुढाऱ्यांनी पण विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी आपलीही एक रॅली घेण्याचे ठरवले. मुस्लिम वस्त्यांमधील शाळांतील मुलांना सक्ती करण्यात आली की त्यांच्या आयांनी रॅलीला आलेच पाहिजे. रॅली कशासंबंधी हेही त्यांना सांगितले गेले नव्हते. धर्म-रक्षणार्थ काहीतरी आहे असे समजून त्या आल्या होत्या. आमच्या कार्यकर्त्या त्या रॅलीत विधेयकासंबंधी आमची काय भूमिका आहे ते मांडणारी उर्दू पत्रके घेऊन गेल्या होत्या व गुपचुप ती पत्रके वाटत होत्या. ती पत्रके वाचून अनेक स्त्रिया सर्दच झाल्या व स्टेजवर बसलेल्या मुस्लिम नेत्यांना उघड उघड शिव्या देऊ लागल्या. कारण स्टेजवरच्या नेत्या नुसत्याच धर्मरक्षणार्थ घोषणा देत होत्या व पोटगीसंबंधी काही ठोस भूमिका घेत नव्हत्या. निष्कारण तणाव पैदा होऊ नयेत म्हणून अखेर आम्हालाच त्यांना आवरावे लागले. घटस्फोटानंतर मिळणाऱ्या पोटगीचा हक्क ज्या धर्मनिरपेक्ष पातळीवर आम्ही समजावून सांगत होतो त्याचे मुस्लिम स्त्रियांनी मनापासून स्वागत केले. प्रत्यक्षात वेगळ्याच कारणांसाठी त्यांच्या हक्कांचा बळी देण्यात आला ती गोष्ट वेगळी; पण तेव्हापासून अनेक मुस्लिम स्त्रिया आपल्या कुटुंबियांच्या प्रसंगी धर्ममार्तंडांचा रोष पत्करून आमच्याबरोबर खंबीरपणे प्रत्येक प्रश्नावर लढण्यासाठी उभ्या आहेत.

हे काळे विधेयक लोकसभेत पास झाले त्या दिवशीचे आमचे लोकसभेबाहेरील निदर्शनही अभूतपूर्वच होते. अचानक थव्याथव्याने लोकसभेबाहेर स्त्रिया जमा झाल्या व सर्वांनी एकमेकींना साखळीने बांधून घेऊन अखेर पार्लमेंटच्या गेटलाही बांधून घेतले. पोलिसांची खूपच तारांबळ उडाली. आरी आणवून साखळ्या तोडायला जवळजवळ

अडीच–तीन तास लागले. तोपर्यंत रहदारी बंद व सर्व शहरभर ह्याची चर्चा पसरल्याने लोकांची गर्दी. 'व्हिप'च्या बळावर अखेर विधेयक पास झाले तरी सरकारच्या या कृष्ण-कृत्याचा जागोजाग बोभाटा झाला.

मुस्लिम विधेयकाप्रमाणेच अखिल भारतीय पातळीवर गाजलेला व सर्वांच्या स्मरणात अगदी ताजा असलेला प्रसंग म्हणजे दिवरालामधे सतीच्या नावाखाली झालेली रूपकुंवरची हत्या. आज देशभर अनेक स्त्रियांवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत आहेत आणि अनेक स्त्रियांचे बळी जात आहेत. असे असूनही एका रूपकुंवरच्या मृत्यूचे एवढे अवडंबर का माजवण्यात आले असा एक युक्तिवाद केला गेलाच. अद्यापही काही जण तो करत आहेत. सती प्रथेचे ज्या पद्धतीने समर्थन केले गेले व नंतर धर्माच्या व संस्कृतीच्या नावाखाली त्याचे जे महिमामंडन झाले, त्यामुळे विधवा स्त्रीच्या जगण्याच्या हक्काचा प्रश्नच दीडशे वर्षे पाठीमागे नेण्यात आला. पण ह्याही प्रसंगी वेगवेगळ्या थरातल्या व वयाच्या आणि धर्मांच्या अनेक स्त्रिया सती–समर्थकांना विरोध करण्यास खंबीरपणे पुढे आल्या. अखिल भारतीय पातळीवरील अनेक स्त्री-संघटनांनी एकत्र येऊन आपल्या जगण्याच्या हक्काचे समर्थन केले व भारताच्या कानाकोपऱ्यातून स्त्रियांनी ह्या प्रथेला विरोध केला. इतकेच नव्हे तर सरकारला, सती समर्थन करणाऱ्या संघटनांना आणि राजकीय पक्षांनाही विरोध केला.

ह्याचबरोबर पंजाबमधील घटनांचे पडसाद दिल्लीत उमटल्यावाचून राहात नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय एकता व धार्मिक सलोखा हा आमच्या समोर असलेला ज्वलंत प्रश्न आहे. १९८३ पासूनच ह्या प्रश्नावर आम्ही सतत काम करत आहोत. पंजाब प्रश्न राजकीय पातळीवर सोडवला गेला पाहिजे अशी आमची तेव्हाही मागणी होती व आजही आहे. दुर्दैवाने श्रीमती गांधींनी आपल्या व आपल्या पक्षाच्या हिताच्या सीमित दृष्टिकोणातूनच हा प्रश्न हाताळला. त्यात त्यांची हत्या झाली आणि प्रकरण त्यानंतर अधिकच चिघळले. त्यांच्या हत्येनंतर तीन दिवस दिल्लीमधे अडीच हजारांच्यावर निरपराध शिखांची क्रूर हत्या झाली. कर्फ्यू उठल्यानंतर दंगापीडित भागामधे आमच्या कार्यकर्त्यांनी अविरत काम केले. परंतु त्या कालखंडात आलेल्या अनुभवांनी आम्हाला पुनःपुन्हा जाणवले की धर्मांधतेचे विष समाजात फार खोलवर रुजलेले असून स्त्रियांना ह्या विषारी प्रचारापासून वाचवणे अत्यंत आवश्यक आहे. धार्मिक दंग्यांमधे प्रत्यक्ष भाग न घेताही सर्वात अधिक नुकसान स्त्रियांचेच होते. धार्मिक भावनेतून केलेल्या प्रचारापासून मग तो कोणत्याही धर्माचा असो, स्त्रियांना वाचवण्याचे काम आमचे कार्यकर्ते जागरूकतेने करत असतात. त्यासाठी राष्ट्रीय एकता व धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचा प्रचार पत्रकांद्वारे, छोट्या–मोठ्या गल्लीकोपऱ्यातील सभाद्वारे, सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे आणि गेल्या वर्षी तर आंतरराष्ट्रीय महिला दिवसाच्या निमित्ताने काही खेळाद्वारेसुद्धा आम्ही केला. १९८६ च्या मध्यावर दिल्लीत एक सांप्रदायिक सद्भाव समिती स्थापन झाली. समाजाच्या सर्व थरातील लोकशाही तत्त्वांना मानणाऱ्या व धर्मनिरपेक्ष वृत्तीने प्रत्येक प्रश्नाकडे

बदणाऱ्या सर्व व्यवसायातील लोकांचा व संघटनांचा त्यात समावेश होता. ह्या समितीने जनजागरणाचे काम हाती घेतलेले आहे व त्यांच्या कार्यात आमच्या संघटनेने वेळोवेळी सक्रिय भाग घेतला आहे. धार्मिक सलोख्याचा प्रश्न हा आमच्या प्रत्येक कार्यक्रमाचा केन्द्रबिन्दू असतो.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज जितका व्यामिश्र आहे तितकीच ह्या समाजातल्या विविध थरातील स्त्रियांची पातळी हलाखीची आहे. तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणाचे प्रकारही विविध आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात तिची उन्नती होण्याचे बाजूलाच राहिले, तिला अधोगतीच्या मार्गावर पुनःपुन्हा ढकलले जात आहे. तिच्या वेगवेगळ्या दुःखांचा आढावा घेण्याचा मी अल्पसा प्रयत्न येथे केला आहे. पण त्याचबरोबर नशिबाचा अथवा धर्माचा, परंपरेचा बागुलबोवा दाखवून तिला नामोहरम करण्याच्या सर्व प्रयत्नांना धैर्याने तोंड देवून परिस्थिती बदलायला ती कशी खंबीरपणे उभी आहे, ह्याचीही अल्पशी उदाहरणे मी दिली. आज संपूर्ण भारतभर अनेक प्रकारचे लढे स्त्रियांनी उभे केलेले आहेत, परंतु माझे कार्यक्षेत्र दिल्लीपुरतेच मर्यादित असल्यानेच फक्त इतर भगिनींच्या शौर्यगाथा येथे मांडलेल्या नाहीत.

□

# २. स्त्रीमुक्तीचे प्रबळ विरोधक

स्त्रीला दडपण्याचा जितका अधिक प्रयत्न होत आहे तितकीच ती निर्धाराने लढण्यास कशी तयार होत आहे हेही आपण पाहिले. पण तिच्या संघर्षाचा मार्ग सोपा नाही. मुक्तीच्या मार्गात अनेक धोके आणि असंख्य विरोधक आहेत. ह्या धोक्यांचा व विरोधकांचा परिचय करून न घेता लढाईला सिद्ध होणे म्हणजे वांझपणे विझून जाणे अथवा स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेणे होय.

आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला तोंड फोडण्याचे धैर्य दाखवण्यापूर्वी स्त्रीला सगळ्यात पहिली लढाई खरे तर स्वतःविरुद्धच करावी लागते. केवळ स्वतःच्या जन्मापासूनचे नव्हे तर हजारो वर्षांच्या सरंजामी विचारसरणीचे ओझे घेऊनच ती जन्माला आलेली असते. तिच्या संपूर्ण अस्तित्वावर ह्या विचारसरणीचा, म्हणजे कुटुंबातला व समाजातला आपला दर्जा दुय्यमच आहे; आपण निसर्गतःच दुर्बल, क्षुद्र, कनिष्ठ आहोत; आपले कार्यक्षेत्र म्हणजे कुटुंबाची सेवा करणे, मग ती सेवा करता करता मार खावा लागला अथवा जीव गेला तरी करत रहावे इत्यादी विचारांचा पगडा असतो. ही गुलामी विनतक्रार स्वीकारण्यासाठी, इतकेच नव्हे तिच्या मनात त्याला कधी आव्हान

देण्याचा विचारसुद्धा येऊ नये याशाठी पोषक अशी परिस्थिती मुलीच्या जन्मापासून निर्माण करण्यात येते. जन्मापासून ते मरेपर्यंत तिच्यात आणि कुटुंबातील मुलात, पुरुषात जाणीवपूर्वक करण्यात आलेला भेदभाव सर्वपरिचित आहेच. तेव्हा आपण कनिष्ठ आहोत ह्या मानसिकतेतून बाहेर पडायला तिला एका प्रचंड मानसिक संघर्षातून जावे लागते. रात्रंदिवस नवऱ्याचा किंवा घरातल्या इतर मंडळींचा त्रास व कधी शारीरिक इजा सहन करूनही स्त्रिया या गोष्टी चव्हाट्यावर आणण्यास नाखूष असतात ते त्यामुळेच. आज एक अपप्रचार मुद्दाम केला जातोय की हे स्त्री-मुक्तीचे खूळ फारच वाढलेय बुवा. जी ती उठते आणि घरातल्या गोष्टींची लक्तरे चव्हाट्यावर टांगते! पण घराच्या चौकटी-बाहेर पडून आपल्या यातनांना वाचा फोडणाऱ्या एखाद्या धैर्यवान स्त्रीच्या मागे मूकपणे आपले दुःख सोसणाऱ्या हजारो स्त्रिया आजही आहेत. पदरी पडलेली परिस्थिती पवित्र मानून निमूटपणे जीवन जगण्याचे बाळकडू घेऊनच ती वाढलेली असते. त्यामुळे एखाद्या स्त्रीला ह्याविरुद्ध लढण्यास संघटनात्मक पाठिंबा मिळाला तरीही तिचे धैर्य टिकेलच ह्याची खात्री नसते.

## मानसिक गुलामगिरीची मगरमिठी

आमच्या एका युनिटमध्ये माया नावाची एक बाई आहे. नवरा गवंडीकाम करतो. तीन मुले जिवंत आहेत, अर्धवट होऊन गेलेली बरीचशी. नेहमी सगळ्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घ्यायची पण वरचेवर नवऱ्याविरुद्ध तक्रार : 'बाकी सगळं छान आहे हो (म्हणजे नेमकं काय कोण जाणे!) पण मारतो फार!' गल्लीतल्या बायकाही ह्या गोष्टीला दुजोरा द्यायच्या. मारण्याचे प्रसंग अर्थातच संध्याकाळी उशीरा आणि रात्री. अशा वेळी मी तिथे हजर असण्याची शक्यता कमीच. म्हणून खूप समजावून समजावून गल्लीतल्या बायकांना तयार केले की तुम्ही तिच्या मदतीला गेले पाहिजे. हा तिचा वैयक्तिक प्रश्न नसून आपल्या सर्वजणींच्याच सन्मानाचा प्रश्न आहे वगैरे वगैरे. बायका म्हणायच्या, 'ताई तुम्ही ह्या भानगडीत पडू नका.' आम्ही असे काही केले तर उद्या ती आम्हालाच शिव्या देते की नाही ते पाहा. माझी जिद्द प्रचंड. अनेक दिवस मी एकीकडे मायाला व दुसरीकडे गल्लीतल्या बायकांना समजावून तयार करत होते. ह्या काळात मायाचे मार खाणेही चालूच होते. एक दिवस माराची पराकाष्ठा झाली. तिला घराबाहेर काढून भर रस्त्यावर आडवी टाकून बुटांच्या पायांनी नवऱ्याने तुडवले. आता मात्र बायकांना राहवेना. गल्लीतल्या पुरुषांशीही, खरे तर मायाच्या नवऱ्याशीसुद्धा माझे ह्या विषयावर अनेकदा बोलणे झालेले होतेच. परंतु त्या क्षणी त्याच्या मनात राक्षसाने घर केले असले तरी इतरांच्या हृदयाला द्रव फुटला आणि सर्वांनी मधे पडून तिला वाचवण्याचे धाडस केले. आणखी कुणी पोलिसालाही बोलावून आणले. पोलीस समोर दिसला मात्र त्या अर्धमेल्या अवस्थेतही मायाने तिरमिरीने त्याला माझ्या घरच्या भानगडीत पडू नकोस असे सांगितले. त्याला काय, असले काही तरी निमित्त हवेच होते. त्याने

पळ काढला. मायाने आपल्या गल्लीला मध्ये पडल्याबद्दल शिव्या दिल्या. झाले, नवऱ्याची हिंमत मग तर विचारायलाच नको. रात्रभर तिला जमिनीवर खाटेखाली बसवले आणि स्वतः वर आरामात तिच्या पाहाऱ्यासाठी सिगरेट फुंकत बसला.

सकाळी-सकाळीच मला रात्रीच्या रामायणाचा वृत्तांत कळला म्हणून मी धावत गेले. मायाच्या वागण्याचे आश्चर्य वाटत होते आणि मनात कुठेतरी रागही येत होता. हीच माया माझ्याबरोबर इतरांच्या—खुद्द स्वतःच्या वहिणीच्या आणि नणंदेच्या—नवऱ्यांना धडा शिकवण्यासाठी मारण्यात आडवी आली होती आणि माझ्याबरोबर पोलिस स्टेशनवर आली होती! मग आजच काय झालं हिला ह्या विचाराने मी अस्वस्थ झाले होते. वस्तीवर पोहोचले तर सर्व बायका तिच्या खूप विरोधात. मीही विचार केला की अशा वेळी तिला तिच्या नशीबावर सोडून देणं केवळ तिच्या दृष्टीने धोकादायक आहेच पण इतर बायकांवरही त्याचा विपरीतच परिणाम होईल. संघटनेच्या आजवरच्या कामावर पाणी पडेल हाही एक मोठाच तोटा होता. मग पुन्हा बायकांना मोठ्या मुश्किलीने समजावले. मायाला हळूच घराबाहेर काढले. मीच बोलावल्याने नवऱ्याला नाही म्हणता आले नाही. तिलाही समजावले आणि तयार केले की आम्ही तुझ्या नवऱ्याकडून वचन घेतो की ह्यापुढे तो तुला मारणार नाही. आम्ही त्याला घराबाहेरही पडू देणार नाही, तिने मध्ये पडता कामा नये. ती तयार झाली. बायकाही तयार झाल्या. एव्हाना सकाळचे ११ वाजून गेले होते. संध्याकाळी ४ वाजेपर्यंत आम्ही नेटाने त्यांच्या दरवाजावर ठाण मांडून बसलो होतो. आदल्या रात्रीच्या अनुभवावरून त्याला आशा होती की माया त्याला साथ देईल. तो अखेरीस आमच्या जिद्दीपुढे हरला. अनेक प्रकारचा प्रतिवाद करूनही जेव्हा जमेना, तेव्हा अखेर त्याने माघार घेतली. त्यानंतर आजतागायत म्हणजे गेल्या दीड वर्षात मायाला शारीरिक इजा एकदाही झाली नाही. छोटे-मोठे शाब्दिक भांडण होते पण तेवढ्यावरच प्रकरण मिटते. ह्या प्रकरणाचे मायाच्या गल्लीतच नव्हे तर अवतीभवतीच्या दोन-चार गल्ल्यांवर चांगलेच परिणाम झाले आहेत. पण आश्चर्याची गोष्ट अशी की आपण नवऱ्याच्या विरोधात महिला समितीला साथ दिली हे बरोबर केले की चूक ह्या संभ्रमात ह्या प्रसंगानंतरही माया कित्येक दिवस होती. तिला त्या मानसिकतेतून बाहेर काढायला कितीतरी दिवस लागले.

एवढ्या विस्ताराने हे प्रकरण सांगण्याचा उद्देश म्हणजे गुलामगिरीची कल्पना बायकांच्या मनात किती खोलवर रुजलेली आहे, ह्यावर यातून प्रकाश पडतो. ह्या गुलामगिरीचे दर्शन आपल्या सर्वांच्या परिचयाच्या अनेक प्रसंगातून होते. सासरी छळ होतोय हे माहीत असूनही मुलीला माहेरी आश्रय न देणे—आर्थिक कारणातून नव्हे तर सामाजिक प्रतिष्ठेच्या कारणातून—ही भूमिका खूपदा मुलीच्या आईची असते. स्वतः सासूचा त्रास सहन केला असला तरी सून आल्यावर तिला तसेच छळणे, नणंदेने भावजयीला त्रास देणे किंवा सासरहून काही कारणाने माघारी परतलेल्या नणंदेला

भावजर्यांने छळणे, इत्यादी. स्थलकालानुरूप प्रत्येक प्रकरणात इतरही काही घटक कारणीभूत असू शकतात, परंतु सर्वांचा लघुत्तम साधारण विभाजक एकच, परंपरागत विचारसरणीतून निर्माण झालेली मानसिक गुलामगिरी. ह्या विचारसरणीवर आणि ही विचारसरणी बळकट करणाऱ्या भौतिक परिस्थितीवर प्रहार करावयाचा नसला म्हणजे मात्र ' स्त्री हीच स्त्रीची पहिली शत्रू आहे ' असा खोडसाळ प्रचार पुनः पुन्हा केला जातो. वास्तविक जी स्त्री परंपरेने लादलेल्या भूमिकेला आव्हान देऊन स्वतःचे दुःखसुद्धा हलके करू शकत नाही, ती दुसऱ्या स्त्रीच्या दुःखाकडे सहानुभूतीने बघू शकत नसल्यास त्याचा दोष तिच्याकडे की परंपरेकडे ह्यावर विचार व्हायला हवा.

अर्थात ह्या गुलामगिरीच्या मानसिकतेवर स्त्रीने मात केली म्हणजे सर्व काही पदरात पडले असे मात्र नाही. समाज काय म्हणेल ह्याचे प्रचंड दडपण, अंधश्रद्धा, दैववाद, जातीयता अशा कितीतरी गोष्टीखाली ती दबलेली असते. ' जग काय म्हणेल ' ! हा प्रचंड प्रश्न तिला पडला की जगाच्या अफाटपणाच्या संदर्भात ती ज्याला जग म्हणते आहे ते वस्तुतः किती संकुचित, कोतं आहे, हे समजावावे लागते. दैववादाला उत्तर देताना स्वतःच्या वैयक्तिक कर्तृत्वावर तर झालेच; परंतु समाजाच्या सामूहिक प्रयत्नांच्या बळावर परिस्थिती कशी बदलू शकते ते अनेक उदाहरणे देऊन समजवावे लागते. जन्म आणि मृत्यू ह्या अद्याप तरी माणसांच्या संपूर्ण काबूत नसलेल्या गोष्टींचा दैववाद दृढ करण्यासाठी पुनः पुन्हा आधार घेतला जातो. मुलीचा जन्म घेणं एखादीच्या नशिबातच असेल तर तुम्ही त्याला काय करणार आहात ? किंवा मृत्यू काही कुणाच्या हातात नाही. कुणाला कधी, कुठे व कसा मृत्यू येईल हे तुम्ही कसं ठरवणार ? असे प्रश्न विचारून मुद्दाम कोड्यात टाकलं जातं. अशा वेळी दैव व दैववाद ह्यातील फरक केवळ सैद्धांतिक पातळीवर सांगून पटण्याजोगा नसतो तर प्रत्यक्ष दैनंदिन जीवनातले उदाहरण द्यावे लागते. आमची एक सदस्य गंगा हिचा नवरा अल्पवयात अपघातात वारला. पदरी दोन-तीन पोरं. शिक्षण काहीच नाही. तिला दिल्ली वाहतूक निगमाकडून नुकसानभरपाई मिळेल हे तिच्या धूर्त दिरांनी ओळखले होते व गोड-गोड बोलून तिला गोत्यात आणण्याचा त्यांचा बेत होता. तिला ते जाणवत होतं तरी त्यांच्याविरुद्ध जाण्याची हिंमत होत नव्हती म्हणून नशिबावर हवाला ठेवून बसली होती. आम्हाला कळल्यावर आम्ही मदतीस गेलो तर माझा नवरा अपघातात मृत्यू पावण्याचे नशीब तुम्ही बदलू शकला नाहीत तर आणखी काय बदलणार असं म्हणायला लागली. शेवटी तिच्या सतत पाठीशी राहून नुकसानभरपाई तिच्याच हातात देववून मुलांच्या नावाने फिक्स्ड् डिपॉझिट केले तेव्हाच तिला नशीब बदलू शकलो नाही तरी नशिबाने निर्माण केलेल्या परिस्थितीवर मात करू शकतो हे पटले.

अंधश्रद्धेचा फायदा घेऊन बुवाबाजी आणि ढोंग पसरवून लोकांना लुबाडणाऱ्या व्यक्ती आणि संस्था ह्यांच्या कचाट्यात तर स्त्रिया सर्वात जास्त सापडतात दारिद्र्य आणि अनंत अडचणींनी भरलेल्या आयुष्याला काही मानसिक-पारमार्थिक आधार कधी

हवा असतो; तर कधी आजारपण, वंध्यत्व ह्या गोष्टीपासून मुक्तता हवी असते. वंध्यत्व आणि वरचेवर मुली होणं ह्यातून निर्माण होणारा सामाजिक जाच भयानक असतो आणि त्यावर इलाज करण्यासाठी बायका कोणत्या पराकोटीस जातात त्याचे एक भयानक उदाहरण नुकतेच दिल्लीत घडले. आपल्या मुलीला मूल होत नाही म्हणून तिला होणाऱ्या जाचातून मुलीची सुटका करण्यासाठी आईने मांत्रिकाचा सल्ला घेतला. मांत्रिकाने आठ-नऊ वर्षाचे एक मूल मारून त्याचे कपडे त्याने दिलेल्या मंत्रोच्चारीत पाण्याने भिजवून अंगणात पुरायला सांगितले आणि आश्चर्य म्हणजे आईने ते कोणाची तरी मदत घेऊन केले! कोणत्याही तर्काने व युक्तिवादाने आईच्या गुन्ह्याचे गांभीर्य कमी होत नसले तरी ह्या गुन्ह्यामागील सामाजिक सत्य फार विदारक आहे. धार्मिक आणि जातीय भावनांचा पगडाही स्त्रियांवर जबरदस्त असतो. जातीयतेचा प्रश्न केवढे उग्र रूप धारण करू शकतो हे आपण गुजरातेतील दंग्यांवरून पाहिले आहे. परिस्थिती एवढी चिघळण्यापर्यंत वाढू न देण्यासाठी एकूणच दारिद्र्य, बेकारी, विषम संधी इत्यादी विषयांना केंद्रीभूत करून लढे उभे केले पाहिजेत हे तर झालेच; पण अशा लढ्यासाठी स्त्रियांची पूर्वतयारी म्हणून स्त्री पातळीवरच्या अनंत अडचणी बाजूला करून, जात-धर्माच्या भावनांना छेद देऊन, पाणी, सफाई, रेशन इत्यादींच्या लढ्यासाठी स्त्रियांना एका व्यासपीठावर आणण्यातून जातीयतेविरुद्ध काही किमान जाणिवा निर्माण होऊ शकतात. निदान प्रबोधनासाठी काही किमान परिस्थिती निर्माण होते. एरवी निव्वळ मानवतेच्या दृष्टिकोनातून दिलेले व्याख्यान त्यांच्या मनाला कितीही पटले तरी प्रत्यक्ष जीवनात अमलात आणणे त्यांना फार कठीण जाते. मात्र कोणत्याही संघर्षासाठी प्रचार करताना जातीय व धार्मिक सलोख्याचा प्रश्न केंद्रीभूत करून त्यावर संघर्षाच्या मुख्य मागण्यांचे आरोपण करण्याचे कौशल्य कार्यकर्त्यांना दाखवता आले पाहिजे. अर्थात हे एकमेव आणि इतके साधे उत्तर नसून ही फक्त उत्तराची पूर्वतयारी आहे हे पुन्हा एकदा नमूद करायला हवे.

## धर्मांधता, जातीयता आणि स्त्रीची दडपणूक

आजच्या भारतीय परिस्थितीत जातीयता व धर्मांधता ह्या प्रश्नांची मर्यादा केवळ घराच्या चौकटीत धार्मिक रितीरिवाज व आचारविचार पाळण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही किंवा धार्मिक दंग्यांमध्ये मालमत्तेची लुटालूट आणि प्राणहानी ह्यातून विसकटणाऱ्या जीवनापुरती त्याची कक्षा नाही. स्त्रियांच्या बाबतीत तर ह्या प्रश्नाचे स्वरूप अधिक उग्र आहे, कारण गेल्या काही वर्षांत अत्यंत पद्धतशीरपणे धर्माचे नाव घेऊन स्त्रियांच्या मूलभूत अधिकारांवरच हल्ला करण्याचे काम चालू आहे. मुस्लिम महिला विधेयकाविरुद्ध किंवा सती प्रथेविरुद्ध आमच्या संघटनेने तसेच इतर महिला संघटनांनीही काय काम केले हे आपण ह्याआधीच पाहिले. परंतु प्रश्न कोणी किती काम केले असा नाही, आज स्त्री-मुक्ती संघर्षाच्या मार्गावर धार्मिक कट्टरवादी कसे अडथळे निर्माण करत आहेत व

तिच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारावर कसे हल्ले करत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. शाहबानोच्या केसमुळे मुस्लिम स्त्रियांच्या पोटगीचा प्रश्न उजेडात आला तरी पूर्वीसुद्धा मुस्लिम जातीय संघटनांनी मुस्लिम स्त्रीला कसे वागवले आहे त्याची एक दोन उदाहरणांवरून कल्पना येईल. केरळमध्ये जुलेखाबी नावाच्या स्त्रीला बदफैली वर्तनाच्या आरोपावरून सार्वजनिक जागी १०१ फटक्यांची शिक्षा देण्याचा निर्णय जमायत ह्या संस्थेने घेतला. मुस्लिम व्यक्तिगत कायद्याच्या नावाखाली ह्या क्रूर व पुरातन चालीचे पुनरुज्जीवन करून धार्मिक दहशत फैलावण्याचा हा उघड प्रयत्न होता. सुदैवाने केरळमध्ये मागे म्हटल्याप्रमाणे दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक प्रश्नांवर एकत्र लढल्यामुळे काही किमान लोकशाही व धर्मनिरपेक्ष जाणीवा बहुसंख्य स्त्रियांमध्ये आहेत, त्यामुळे जुलेखाबीने ह्या निर्णयास आव्हान दिले आणि आमच्या संघटनेच्या पाठबळावर तिने स्वतःस वाचवले. परंतु ह्यातील जमायतची भूमिका लक्षात ठेवण्यासारखी आहे. पुण्याच्या बेगम अख्तरुन्निसाला मूल दत्तक घेण्याच्या प्रकरणावरून अखेर सुप्रीम कोर्टापर्यंत धाव घ्यावी लागली. तिला कोर्टातर्फे न्याय मिळाला, परंतु तिला झालेला विरोध विसरून चालणार नाही. मुमताज रहिमतपुरेंना तर मुस्लिम महिला विधेयकाविरुद्ध ठामपणे उभे राहिल्याबद्दल प्राण गमवावा लागला, एवढेच नव्हे तर मृत्यूनंतरही त्यांच्या मृत्यू-संस्काराच्या प्रकरणाचे धार्मिक भूमिकेतून रण माजवून धर्मांधांनी आपले धार्मिक आधिपत्य जनमानसावर गाजवण्याचा प्रयत्न केला.

१९५५ साली हिंदू कोड बिल पास झाले तेव्हा हिंदू संघटनांनी त्याला कसून विरोध कसा केला होता हे आपल्याला माहीत आहेच. धर्माच्या नावाखाली नैतिक प्रश्नांचा बागुलबुवा उभा करून पुनः पुन्हा स्त्रियांच्या लोकशाही अधिकारावर हल्ले केले जात आहेत. नुकतेच घडलेले सती प्रकरण ह्याचे ज्वलंत उदाहरण म्हणून समोर आहेच. विधवांच्या जगण्याच्या अधिकारावरचे हे एक जबरदस्त आक्रमण होते हे तर झालेच; पण ह्या निमित्ताने जुनाट, बुरसटलेल्या व एकदा समाजाने लढून निपटून टाकलेल्या पद्धतीचे व रुढीचे पुनरुज्जीवन करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला. समाजजीवनाचे विघटन करू धर्माच्या नावाखाली दहशत फैलावून आपले वर्चस्व स्थापित करण्याच्या मूठभर धर्ममार्तंडांच्या बेतात सर्वात प्रथम स्त्रियांचा व स्त्रियांच्या हक्कांचा बळी दिला जात आहे. त्यामुळे धार्मिक प्रचार करणाऱ्या संघटना व त्यांचे समर्थन करणारे राजकीय पक्ष ह्यांचा स्त्री संघटनांना सतत कसून विरोध करावा लागत आहे. आजकाल ह्या धार्मिक संघटनांनीसुद्धा काही आधुनिक परिभाषा, म्हणजे लोकशाही हक्क, जातीय व धार्मिक सलोखा, दलित, मुस्लिम इ. अल्पसंख्यांकांविषयी बंधुभाव इत्यादींचा प्रयोग आपल्या प्रचारात करून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालवला आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांचे कार्य कशा पातळीवर चालते ह्याचे एकच उदाहरण सांगते.

दिल्लीजवळील रोहतक ह्या गावी एक मज़ार आहे. तिथे वस्तीस असणाऱ्या एका फकीराने तिथे खेळावयास आलेल्या एका छोट्या हिंदू मुलीवर टॉफीचे आमिष दाखवून

बलात्कार केला. फकीराला पकडण्यात आले व नंतर जामिनावर सोडण्यात आले. प्रथम हा प्रश्न एका छोट्या मुलीवर बलात्कार एवढ्यापुरताच मर्यादित होता. पण स्थानिक हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी ह्यातील हिंदु-मुस्लिम मुद्द्याचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला. त्याच दिवशी गावात भारतीय जनता पक्षाची जाहीर सभा होती. त्यासाठी बाहेरून आलेल्या पुढाऱ्यांना खूष करण्यासाठी ह्या फकीराला पकडून पुढाऱ्यांसमोर उभे करण्याचा त्यांचा बेत होता. अर्थात महिला समिती तिथे अस्तित्वात असल्याने व जोराने कार्यरत असल्याने त्यांनी ह्यात हस्तक्षेप करून ह्या प्रश्नाला लागणारे हिडीस वळण, इतकेच नव्हे तर संभाव्य दंगेही टाळले. वास्तविक, सर्वसामान्य जनता, विशेषतः स्त्रिया आपल्या वाटणीला आलेल्या अडचणींना तोंड देत मोठ्या मुश्किलीनं जिणं कंठत असतात. दंगेधोपे आणि त्यातून निर्माण होणारी असुरक्षितता कुणालाच, विशेषतः स्त्रियांना तर मुळीच नको असते. पण सर्वात मागासलेल्या व निरक्षर त्याच, त्यामुळे सर्वात पहिला बळी त्यांच्या अधिकाराचा पडतो. त्यामुळे आज स्त्रीला स्वतःचे अस्तित्व टिकवून धरायचे असेल तर तिला ह्या विषारी धर्मांध प्रचाराला थोपवून धरण्याएवढे बळ हवे.

परंतु हे बळ कमवण्याची पूर्वअट म्हणजे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, कायद्याचा पाठिंबा, सुदृढ आरोग्य आणि मानसिक निर्भयता हवी. लोकशाही राज्यपद्धतीत सर्व-सामान्य जनतेला आणि विशेषकरून समाजातील दुर्बल घटकांना ह्या संधी प्राप्त करून देण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची असते, त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या प्रश्नावर शासनाने कशी भूमिका घेतली आहे हेही पाहायला हवे.

## सरकारी धोरणे व नोकरयंत्रणा स्त्रीविरोधीच

ज्या सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे स्त्रीच्या शक्तीचा, क्षमतांचा आजवर विकास न होता ती दुर्बल राहिली आहे; त्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीशी टक्कर देत देत, एक स्त्री, एक श्रमिक व एक नागरिक म्हणून आपली भूमिका खंबीरपणे निभावण्यासाठी शासनाच्या पाठिंब्याची आणि सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोणाची आवश्यकता असते. परंतु शासनातर्फे ज्या विविध घोषणा वरवरच्या देखाव्यासाठी केल्या जातात त्या आणि आपला प्रत्यक्ष अनुभव यामध्ये प्रचंड दरी असल्याचे पुनः पुन्हा प्रत्ययाला येते. मुळात ज्या काही थोड्याफार सवलती स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना मिळालेल्या आहेत त्या सर्वांसाठी त्यांना प्रचंड लढत द्यावी लागली आहे. आणि अशा लढून मिळवलेल्या कित्येक गोष्टी अद्यापही केवळ कागदोपत्रीच दाखल आहेत. स्त्री-संघटनांच्या जागरूक कार्यकर्त्यांनासुद्धा ह्या शासकीय उदासिनतेविरुद्ध लढावे लागते तर एखाद्या अडाणी, गरीब स्त्रीची किती ससेहोलपट होत असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी!

उपलब्ध सवलत पदरात पाडून घेण्यासाठी कधी नोकरशाहीशी तर कधी राज्यकर्त्यांशी सतत लढत कशी द्यावी लागते त्याची एकदोन उदाहरणे पाहूया. शांती नावाच्या

एका बाईचा गवंडीकाम करणारा नवरा कर्ज काढून मध्यपूर्वेत गेला. इथे चार निरक्षर बायको, चार छोटी-छोटी मुले व विधवा आईला सोडून तो गेला होता, पण दुर्दैवाने तिथे रस्त्यावरील अपघातात त्याचे निधन झाले. स्थानिक कायद्याप्रमाणे सर्वात जवळच्या आप्ताची लेखी परवानगी असल्याशिवाय मृतदेहाचे क्रियाकर्म करणे शक्य नव्हते. अशी परवानगी न मिळाल्यास कंपनीला स्वतःच्या खर्चाने मृतदेह मृताच्या स्वदेशी परत पाठवावा लागतो. म्हणजे प्रवासखर्च तर आलाच, शिवाय त्या देहाला प्रवासात सडू नये म्हणून रसायने लावायचा खर्च वेगळाच, त्यावरील कागदपत्रे तयार करणे वगैरे बरीच धडपड. मग सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे त्या जवळच्या आप्ताला मृत्यूची बातमी देणारी तार पाठवायची. इथवर येऊन शव घेऊन जा अशा दुःखातदेखील छातीवर दडपण आणणारा संदेश पाठवायचा आणि हे जमणार नसेल तर तुमची लेखी परवानगी द्या अशी हळूच सूचना द्यायची. थोडक्यात भावनिक व आर्थिक दडपण आणून आपला खर्च कमी करायचा असा ह्या कंपन्यांचा हेतू असतो. शांतीलाही अशी परवानगी द्या. थोडक्यात भावनिक व आर्थिक दडपण आणून आपला खर्च कमी करायचा असा ह्या कंपन्यांचा हेतू असतो. शांतीलाही अशी परवानगी द्या म्हणून सूचना करणारी तार आली. सुरुवातीला तीही घाबरूनच गेली पण आमच्या संपर्कात आल्यानंतर आम्ही व तिने मिळून काहीतरी धडपड करायचे ठरवले. अशी केस पूर्वी केलेली नसल्याने आमचेही ज्ञान अपुरेच, पण प्रयत्न तरी करून बघू असे वाटले. ह्या संदर्भात श्रम-मंत्रालय आणि विदेश मंत्रालयातल्या अगदी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा जो अनुभव आला त्यावरून त्यांचा आपल्या देशातल्या एका गरीब विधवेला मदत करण्याऐवजी एका परदेशी कंपनीचा खर्च आणि खटाटोप वाचवण्याचा कावा चांगलाच उघडकीला आला. आम्ही ह्या क्षेत्रातच अनुभवी आहोत हे त्यांच्या सूक्ष्म दृष्टीने ताडले व आमच्या मार्फत शांतीवर लेखी परवानगी देण्यासाठी अतिशय हुशारीने त्यांनी दडपण आणले. सतत वीस दिवस ह्या वाटाघाटी चालू होत्या. अखेरीस आम्ही माघार घेत नाही असे पाहिल्यावर एकविसाव्या दिवशी शव येथवर आणण्याची व्यवस्था केली गेली. त्यानंतर तिला नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पुढे दीड वर्षे झगडावे लागले तेव्हा कुठे तिच्या पदरी ७८,००० रुपये पडले.

दुसऱ्या एका प्रसंगी, एक सरकारी नोकरीत असलेला माळी आजारपणात मृत्यू पावला. पाठीमागे बायको व लहान मुले. अशा वेळी भूतदयेच्या तत्त्वावर तिला त्याच्या जागी नोकरी तत्काळ मिळायला हवी होती. तिला ह्या हक्काची फारशी कल्पना नव्हती; पण आजुबाजुच्या लोकांनी जाणीव करून दिली. एक-दीड वर्ष विचारीने त्याच्या ऑफीसमध्ये खेटे घातले पण कोणीच तिला धड माहिती दिली नाही व खूप तंगवले. संबंधित कारकुनांना काही चिरिमिरी हवी होती; परंतु तिची अवस्था पाहिल्यावर ती मिळणे शक्य नाही अशी खात्री झाल्याने तिला वेगवेगळी कारणे सांगून नुसतेच खेटे घालायला लावले. आमच्या संपर्कात ती योगायोगाने आल्यावर थोड्याशा धावपळीनंतर

तिथे काम झाले. नोकरशाहीच्या उदासिनतेची अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. हुंडाबंदी चळवळीच्या निमित्ताने जे अनेक लढे दिल्लीत झाले त्याचा परिणाम म्हणून दिल्ली पोलिसांनी एक स्त्री-विभाग सुरू केला आहे. त्यांचा उद्देश स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची विशेष व तावडतोब दखल घेतली जावी असा आहे. परंतु प्रत्यक्षात अनुभव असा की आता छोट्या-छोट्या पोलीस पोस्ट व स्थानकांवर स्त्रियांची केस पटकन घेतच नाहीत. 'वुमेन्स सेल'कडे बोट दाखवतात. वुमेन्स सेलमध्ये जो लालफिती खाक्या आहे व अद्यापही स्त्रीकडे एका पारंपरिक दृष्टिकोणातूनच बघण्याची प्रवृत्ती आहे, त्यामुळे अनेकदा स्त्रियांना आगीतून उठून फुफाट्यातच गेल्यासारखे वाटते. दीर्घकाल तुंबून राहिलेल्या केसेसचा लौकर निकाल लागावा म्हणून आजकाल लोकन्यायालय नावाचा प्रकार सुरू झाला आहे. त्यातही पती-पत्नीच्या दुराव्यासंबंधीच्या प्रकरणांचा असाच पारंपरिक दृष्टिकोणातून निकाल देण्यात येतो, असा आमचा अनुभव आहे. घर सोडून आलेल्या स्त्रीला तिच्या अडचणींच्या फारशा खोलात न जाता तिनेच थोडीशी माघार घेऊन, सर्वांना सांभाळून राहणे कसे तिच्या दृष्टीने आवश्यक आहे असाच उपदेश करून तिला समझोत्याच्या नावाखाली परत पाठवण्यात येते. नोकरशाहीच्या ह्या उदासीन व सहानुभूतीशून्य दृष्टिकोणाचा आपणा सर्वांना चांगला परिचय आहेच.

परंतु अडचणी केवळ भ्रष्टाचारातून, लालफितीतून किंवा नोकरशाहीच्या औदासिन्यातून निर्माण होतात असे नव्हे. किंबहुना थोडा नेट लावल्यास ह्या अडचणींवर बऱ्याचशा प्रमाणात मातही करता येते. खरी मूलभूत टक्कर द्यावी लागते ती सरकारी धोरणांविरुद्ध, आणि वेगवेगळ्या प्रश्नांवर राज्यकर्ते घेत असलेल्या भूमिकांविरुद्ध. धार्मिक परंपरांचे पुनरुज्जीवन विरुद्ध स्त्रियांचे हक्क ह्या गेल्या चार-पाच वर्षांमधील गाजलेल्या लढ्यांमध्ये राज्यकर्त्यांनी ह्या संबंधात घेतलेली भूमिका पाहिली म्हणजे स्त्रियांना एवढी अटीतटीची लढत का घ्यावी लागली हे कळते. १९४० च्या दशकात जेव्हा हिंदू कोड बिलाचा प्रश्न आला तेव्हाही काही हिंदुत्ववादी संघटनांनी आणि कॉंग्रेसमधल्या काही लोकांनी त्याविरुद्ध दावे केले, तरीही कॉंग्रेसमधेच एका धर्मनिरपेक्ष गटाने बिलाला जोरदार पाठिंबा दिला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काही काळ हा गट कॉंग्रेसमध्ये प्रभावशाली होता आणि त्यामुळे कॉंग्रेसची प्रतिमा अद्याप धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून जनतेमध्ये होती. परंतु निवडणुकांचे राजकारण करत करत धार्मिक नेत्यांचा पाठिंबा मिळवण्याची गरज पुढे एवढी वाढत गेली की धर्माच्या नावाखाली कोणत्याही प्रतिगामी प्रवृत्तीला खतपाणी घातले तरी त्याला विरोध करण्याची ताकद सत्ताधाऱ्यांमध्ये राहिली नाही. पंजाबमध्ये अकाली दलाने केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये शीख व्यक्तिगत कायद्याला मान्यता देण्याची मागणी केली आहे.

शीख व्यक्तिगत कायद्याप्रमाणे एखाद्या स्त्रीचा नवरा अकाली मृत्यू पावला तर तिने आपल्या दीराशी लग्न केलेच पाहिजे अशी तरतूद आहे. वरवर पाहता हा विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न वाटला तरी ह्यात घरातली संपत्ती बाहेर जावू नये म्हणून स्त्रीवर

सक्ती करण्यात आली आहे. ह्याचा निषेध म्हणून आमचे प्रतिनिधीमंडळ श्रीमती गांधींना भेटले, तेव्हा त्यांनी ह्या मागणीस संप्रदायाकडून पाठिंबा आहे व ह्यामुळे संसतीचे संरक्षण होते असा प्रतिवाद केला व उघड उघड राजकीय स्वार्थापुढे स्त्रीच्या हक्काचा बळी देण्यास आपली अपरोक्ष अनुमती दर्शवली. वर्षा-दोन वर्षांत एरवी आधुनिक समजल्या जाणाऱ्या त्यांच्या पुत्रानेही मुस्लिम कट्टरवाद्यांच्या दडपणापुढे अशीच मान तुकवली. हा वाद उत्पन्न झाला तेव्हा त्यांनी प्रथम अशी भूमिका घेतली की तलाक-पीडित स्त्रीला पोटगी मिळावी ह्या मागणीला मुस्लिम समाजांतर्गत काही पाठिंबा आहे असं तुम्ही मला पटवून दिलंत तर मी त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करीन. तसेच अंतिम निर्णय घेण्यापूर्वी मी महिला संघटनांचा सल्ला निश्चित घेईन. त्यावर आम्ही मुस्लिम समाजांतर्गत सुधारणावादी आणि पुरोगामी अशा एका मोठ्या गटाचा आम्हाला पाठिंबा आहे हे सभा, संमेलने आणि सह्यांची मोहीम वगैरे अनेक पद्धतींनी सिद्ध करून दाखवले. परंतु मुंबईचे कुप्रसिद्ध स्मगलर हाजी मस्तान ह्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या, एकही स्त्री सामील नसलेल्या मोर्चांचे आणि तत्सम मुस्लिम नेतृत्वाचे पंतप्रधानांना अधिक महत्त्व वाटले. ह्या उलट केरळमधल्या मलापुरम जिल्ह्यात मुस्लिम नेत्यांनी बुरखा घातलेल्या स्त्रियांनी मोर्चात जाता कामा नये असा फतवा काढला असूनही आमच्या संघटनेने १२०० बुरखाधारी स्त्रियांचा मोर्चा यशस्वी करून खुद्द मुस्लिम स्त्रियांच्या ह्या संदर्भातल्या भावनांचे व रागाचे प्रदर्शन घडवले. परंतु राजकीय हेतूंसाठी राजकारण व धर्म ह्यांची गल्लत करून स्त्रियांच्या अधिकारांचा बळी देण्यात आला.

नुकत्याच घडलेल्या सती प्रकरणातील काही मोजक्या घटनांची नोंद घेतली तरी पुनश्च हाच मुद्दा सिद्ध होतो. राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांचे लोकांच्या धार्मिक भावनांचा अधिक्षेप न करण्याचे विधान, पंतप्रधानांचे तीन आठवड्यानंतर आलेले गुळमुळीत विधान, विधानसभेच्या सत्ताधारी पक्षाच्या सभासदांचे 'चुनडी समारोहाला' उपस्थित राहाणे, वगैरे गोष्टी कशाच्या निदर्शक आहेत! लोकसभेच्या अखेरच्या दिवशी अखेरच्या तासात घाईघाईने पास करून घेतलेल्या सतीविरोधी कायद्यावर बारकाईने नजर फिरवली तर अद्यापही केवळ विरोधकांच्या तोंडाला पाने पुसण्यासाठी हा कायदा केलेला असून ह्यात स्त्रियांविषयक कळवळा कुठेही दिसत नसल्याचेच आढळून येईल. जिच्यावर जबरदस्तीने सती होणे लादले जात आहे, ती आत्महत्येच्या गुन्ह्याखाली गुन्हेगार ठरणार आणि प्रत्यक्ष तिचे मारेकरी मात्र आत्महत्येला प्रेरक गुन्हेगार ठरणार. सती जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीला सहा महिने आणि गुन्ह्याला प्रेरक असणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा असा हास्यास्पद आणि न्यायालयात कधीही अंमलात आणला जाणार नाही असा कायदा मुद्दाम करण्यामागे सरकारचे सती धर्मरक्षकांना पाठीआड घालण्याचे धोरण चांगलेच उघड होते. इतरही असेच बारकावे ह्या विधेयकात जाणूनबुजून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच सतीविरोधी कायदा का तर धर्माने ह्या प्रथेला मान्यता दिल्याचा पुरावा ठामपणे सापडत नाही म्हणून. आणि समजा सापडला असता तर!

हा तर्क लागू करावयाचा झाला तर आज काही मुस्लिम राष्ट्रांमध्ये धार्मिक पुनरुज्जीवनाच्या नावाखाली स्त्रियांना क्रूर शिक्षा देण्याचे जे प्रकार वाढले आहेत त्या सर्वांचे समर्थनच करावे लागेल.

प्रश्न आपल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याचा असो अथवा महागाईमुळे दुर्धर झालेल्या जीवनक्रमाचा असो; आज हजारो स्त्रिया सरकारी धोरणांच्या प्राथमिकतेलाच आव्हान देण्यासाठी रस्त्यावर उतरत आहेत. सहा पंचवार्षिक योजना होऊन गेल्या, हरित क्रांतीचा एवढा गवगवा झाला, देश आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एका नव्या युगात प्रवेश करणार असल्याच्या घोषणा झाल्या; पण स्त्रियांच्या प्रतिष्ठेत, राहणीमानात अथवा दैनंदिन जीवनातल्या कष्टात त्याचे प्रतिबिंब उमटल्याचे आढळून येत नाही. १९८१ च्या खानेसुमारीच्या आकड्यानुसार १५ ते ५९ या वयोगटातील १७.३ कोटी स्त्रियांपैकी ४.५ कोटी स्त्रिया पूर्णवेळ काम करतात आणि २.८ कोटी अर्धवेळ काम करतात. ह्याचा अर्थ १९८१ साली देशामधे १० कोटी स्त्रिया आर्थिकदृष्ट्या घरातील पुरुषांवर पूर्णपणे अवलंबून होत्या. आज तो आकडा किती वाढला असेल ह्याची आपण कल्पना करू शकतो. ह्यापैकी स्वतःची संपत्ती असणाऱ्या काही स्त्रिया सोडल्या तर हा आकडा फार तर काही लाखांनी कमी येईल पण एकूण आकडा चिंताजनक आहे ह्यात शंका नाही. अशा वेळी अधिकाधिक स्त्रियांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी योग्य त्या योजना आखण्याऐवजी उत्पादन वाढवण्याच्या नावाखाली व यांत्रिकीकरणाच्या नावाखाली असलेले रोजगारही काढून घेतले जात आहेत. आंध्र प्रदेशात आय. टी. सी. कंपनीमधे एक तंबाखू कुटणारे मशीन आयात करण्याची परवानगी देण्यात आली. ह्या एकाच यंत्रामुळे ४८००० स्त्रियांच्या नोकरीवर गदा येणार होती. परंतु तेथील कामगार संघटनांतील स्त्रियांनी वेळीच आवाज उठवला आणि आपले गाऱ्हाणे श्रीमती गांधींपर्यंत नेले. परंतु त्यांनी परदेशातील स्पर्धेला तोंड देण्यासाठी यंत्राची आवश्यकता कशी आहे हेच समजावण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या दृष्टीने हा त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याने त्यांनी ह्या प्रश्नावर उग्र लढा दिला, त्यामुळे आजपर्यंत तरी त्या यंत्राचा वापर त्यांच्या संपूर्ण कार्यक्षमतेएवढा होऊ शकलेला नाही. अशाच प्रकारे खाणीच्या क्षेत्रात खुद्द सरकारनेच ५०,००० स्त्री मजुरांची कपात केली, काथ्याच्या उद्योगात नवीन यंत्रे आल्याने चार लाख स्त्रिया बेकार झाल्या. सरकारी उद्योगांची जर ही अवस्था असेल तर निमसरकारी व खाजगी उद्योगांत काय चालले असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या आंदोलनाला सरकारी धोरणांवर हल्ला करून त्या धोरणांच्या प्राथमिकतेलाच आव्हान दिल्याशिवाय गत्यंतर राहात नाही. महागाई, दुष्काळ, किमान मजुरी हे सर्व प्रश्न सरळ सरळ सरकारी धोरणांशी निगडीत आहेत. त्यामुळे शासनकर्त्यांशी उघड उघड संघर्ष करावाच लागतो.

## प्रसारमाध्यमे : स्त्रीचा मायावी शत्रू

सरकारी ध्येय-धोरणे, भ्रष्ट व सुस्त नोकरशाही, धार्मिक कट्टरपंथी, जुनाट प्रतिगामी

विचारसरणी वगैरे घटकांबरोबर एक प्रकारे उघड उघड संघर्ष करता येतो. कारण ह्या घटकांशी स्त्रीच्या दुरवस्थेचा कार्यकारण संबंध जोडून दाखवणे बऱ्याच प्रमाणात शक्य होते. परंतु सूक्ष्म, अदृश्य परंतु निश्चितपणे परिणाम घडवणारे जे घटक आज स्त्रियांचा दर्जा खाली आणण्यास कारणीभूत आहेत, त्यापैकी प्रसारमाध्यम हा एक महत्त्वाचा घटक प्रसारमाध्यम मग ते सरकारी असो वा खाजगी, दृक्-श्राव्य असो अथवा लिखित, स्त्रीची एक विशिष्ट प्रतिमा जनमानसावर दृढ करण्याचे काम ही माध्यमे करत असतात. त्यामुळे अधूनमधून त्यांच्याविरुद्धही शस्त्र उगारावे लागतेच. निव्वळ एक विशिष्ट प्रतिमा निर्माण करून भागतेच असे नाही. प्रत्येक समस्येच्या बाबतीत एक विशिष्ट भूमिका घेऊन ती फार पद्धतशीरपणे वाचकांपर्यंत अथवा प्रेक्षकांपर्यंत पोचवून जनमनावर पगडा बसवण्याचे व त्यायोगे संघर्षाची धार कमी करण्याचे, किंवा संघर्षाच्या केन्द्रबिंदूकडून लोकांचे मन हलवून दुसरीकडे केंद्रित करण्याचे कामही प्रसारमाध्यमे करतात. मुस्लिम महिला विधेयकाच्या वेळी ज्या चर्चा झाल्या, त्यात अगदी कट्टर मुस्लिम वृत्तपत्रे अथवा नियतकालिके सोडल्यास बहुतांश वृत्तपत्रांनी, विशेषतः अखिल भारतीय पातळीवरच्या वृत्तपत्रांनी बरीचशी पुरोगामी भूमिका घेतली होती. अर्थात प्रत्येक भूमिकेतल्या छटांमध्ये फरक असला तरी एकूण विधेयकाला विरोध करण्याचा सूर आढळून आला. अर्थात ह्यातील मुस्लिम स्त्रियांच्या हक्काबद्दल कळवळा किती आणि ह्या निमित्ताने मुस्लिम धर्मातील चालीरितींवर थोडाफार उघड हल्ला करण्याची संधी मिळत आहे तर ती पूर्णत्वाने वापरली पाहिजे ही भावना किती हा प्रश्न अलाहिदा! पण अशा प्रकारच्या वृत्तपत्रांचे पितळ पुढे सती-प्रकरणी चांगलेच उघडे पडले व आम्हाला सती-विरोधी आघाडीच्या कामात एक हल्ला, ह्या वृत्तपत्रांविरुद्धपण करावा लागला. एक्सप्रेस गटाचे जनसत्ता हे दैनिक संपूर्ण उत्तर भारतात हिंदी भाषकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाचले जाते. ह्या दैनिकाने मुस्लिम महिला विधेयकाविरुद्ध खूपच धीट भूमिका घेतली होती व लोकांच्या मनात आपण एक आधुनिक व पुरोगामी वृत्तीचे दैनिक असल्याचा आभास निर्माण केला होता. परंतु ह्याच दैनिकाने सती प्रथेच्या समर्थनार्थ संपादकीय लिहिले, इतकेच नव्हे तर आम्ही त्याविरुद्ध संपादकांना घेराव केला म्हणून त्यानंतर तर एकूणच स्त्री-मुक्तीच्या प्रश्नावर निरर्गल असे गरळ ओकले. टाईम्स गटाने ह्या निमित्ताने मोठ्या चलाखीने आपल्या स्पर्धकावर होत असलेल्या परस्पर हल्ल्याचा उपयोग करून घेतला. पण मूळ प्रश्नाबाबत मात्र मुस्लिम महिला विधेयकाच्या वेळची धिटाई टाकून थोड्या सावधपणे आपली भूमिका मांडली.

लोकशाही अधिकार व धर्मनिरपेक्षता ह्या तत्त्वांचा असा सोयीनुसार वापर खाजगी माध्यमे तर करतातच; पण सरकारी माध्यमेही ह्यापेक्षा वेगळी नाहीत. बेगम अबिदा अहमद आणि नजमा हेपतुल्ला ह्यांनी आयोजित केलेल्या जाहीर मेळाव्याचे संपूर्ण वृत्तचित्र दूरदर्शनवर दाखवण्यात आले. परंतु विरोधात झालेल्या जाहीर मेळाव्याचा एका वाक्याच्या वृत्तात निकाल लावण्यात आला हे तर आधी सांगितले आहेच. वास्तविक

अखिल भारतीय पतळीवरचा मुस्लिम महिलांचा तो एकमेव मेळावा होता. सती प्रकरणातही सरकारकडून झालेल्या दिरंगाईचे व औदासिन्याचे मोठ्या हुशारीने समर्थन करणारे कार्यक्रम दाखवण्यात आले. परंतु स्त्री-संघटनांची भूमिका मांडण्यास अवसर देण्यात आला नाही. दूरदर्शन हे तथाकथित निःपक्षपाती सरकारी माध्यम असा पक्षपात नेहमीच करते व लोकशाहीच्या प्राथमिक तत्त्वांना धाब्यावर बसवते. ह्या तक्रारी अर्थात प्रासंगिक आहेत, परंतु ह्याहून गंभीर व महत्त्वाची तक्रार म्हणजे स्त्रियांची निर्माण करण्यात आलेली प्रतिमा व त्या निमित्ताने लढाऊ संघटनांचा केलेला उपहास व हास्यास्पद चित्रण.

प्रसारमाध्यम हे आधुनिक युगातले समाजाच्या विचारशक्तीला चेतना देणारे अथवा गुंगी आणणारे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे ह्या माध्यमाने चित्रित केलेली स्त्रीची प्रतिमा समाजाच्या स्त्री-विषयक भूमिका घडवण्यात एक महत्वाची भूमिका करते. म्हणूनच ह्याबाबतीत स्त्री-संघटनांना डोळ्यात तेल घालून जागरूक राहाण्याची वेळ आलेली आहे. ज्या पुरातन रुढीवादी मागासलेल्या विचारसरणीच्या पकडीतून स्वतःची सुटका करून घेतल्याशिवाय आज स्त्रीला निर्भयपणे वावरता येणार नाही, त्या विचार-सरणीचाच पुरस्कार आज पुनः पुन्हा मोठ्या हिरीरीने होताना दिसून येतो. हिंदी चित्रपटांची नायिका हिरोच्या सर्व दुर्वर्तनांना—मग त्यात त्याचा बदफैलीपणासुद्धा आलाच—मोठ्या उदारतेने माफ करते आणि त्याच्याशी जन्मजन्मांतरीचे नाते जोडण्याची शपथ घेत असते. उच्चभ्रू मंडळींसाठी इतर अनेक पर्यायी सांस्कृतिक माध्यमे असली तरी सर्वसामान्य जनतेसाठी, खेड्यापाड्यापर्यंत पसरलेले हेच एक प्रभावी माध्यम असल्याने, त्यातून होणाऱ्या परिणामांचा गंभीर विचार करावा लागतो. सती-सावित्रीच्या पारंपरिक भूमिकेत एकदा स्त्रीला दाखवून झाले की जाहिरातीमधून ती एक उपभोगाचे साधन, क्रयवस्तू म्हणून दाखवली जाते. जाहीरातींमध्येसुद्धा तिची भूमिका आई, कन्या, पत्नी, सून अशीच पारंपरिक नमुन्याची दाखविलेली असते. मी नोकरी करत असले तरीही अमुक अमुक वस्तू वापरते, म्हणून ह्या सर्व भूमिका किती आदर्शपणे पार पाडू शकते हेच ती जाहीरातीतली स्त्री सांगत असते. हजारो नोकरी करणाऱ्या स्त्रिया हे बघतात, ती वस्तू वापरतात आणि तरीही आपण त्या आदर्श भूमिकेपर्यंत पोचू शकत नाही हे लक्षात आल्यावर एक प्रकारच्या अपराधी मानसिक अवस्थेत समाजात वावरतात. ह्या भूमिका आदर्श ठरवण्याचा अधिकार 'विम' अथवा 'रिन' निर्माण करणाऱ्यांना कुणी दिला किंवा माझी परीक्षा घेणारे हे कोण असं विचारायला पाहिजे एवढीसुद्धा वैचारिक ताकद निर्माण करण्याइतका अवसर ही माध्यमे स्त्रीला देत नाहीत. स्त्रीच्या सौंदर्याचे व त्या निमित्ताने शरीराचे प्रदर्शन करून, त्या मोबदल्यात टायरपासून टूथपेस्ट पर्यंत सर्व वस्तू विकण्याची स्पर्धा त्यांच्या उत्पादकात कशी लागलेली असते ते आपण नित्य दूरदर्शनवर बघतोच. स्त्री ही अशी पतिभक्तिपरायण आहे, आदर्श माता, गृहिणी, कन्या आहे; उत्पादकांचा नफा वाढवणारे चलनी नाणे आहे, हे रोज रोज दाखवून

तिच्या संबंधीची ही प्रतिमा इतर जनतेच्याच नव्हे तर तिच्या स्वतःच्याच मनात दृढ केली जाते. पुनः पुन्हा जाहिराती दाखवून समाजाची उपभोग्य वस्तू जरूर नसली तरी विकत घेण्याची अतिभोगवादी प्रवृत्ती जाणीवपूर्वक वाढवली जाते; हुंड्यामध्ये अधिकाधिक वस्तू मागण्याची लालसा वळावत जाण्यासाठीही जाहिराती हा एक महत्त्वाचा घटक आहे.

अर्थात ह्यापेक्षाही अधिक प्रभावी पण अधिक सूक्ष्म व मोठ्या चलाखीने सर्व स्त्री-मुक्ती संघर्षाच्या वाटेत येणारा अडसर म्हणजे दूरदर्शन मालिका. आजकाल दर रविवारी सकाळी रामायण दाखवले जाते. रामायण ह्या महाकाव्याविषयी, तसेच लोकांच्या धार्मिक भावना ज्यांच्याशी जोडल्या आहेत, अशा रामायणसारख्या कृती दूरदर्शनसारख्या सरकारी माध्यमातून दाखवल्या जाव्यात की नाही ह्याविषयी वेगळ्याच पातळीवर चर्चा करता येईल. येथे मी त्या वादात शिरत नाही. पण सध्या दूरदर्शनवर जे रामायण म्हणून लोकांच्या गळी उतरवले जात आहे, त्यावर मात्र आक्षेप घेता येतो. या मालिकेत स्त्रियांबद्दल असे काही म्हटले अथवा दाखवले जाते की : ते पचनी पाडून घेऊन व त्याचा दाखला देऊन बायकांना आजकाल अधिक मार खावा लागत आहे हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. रूढीवादी विचारसरणी व माणसामाणसांमधले सरंजामी परस्पर-संबंध यांचे पुनरुज्जीवन करण्याचा हा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. इतरही अनेक मालिका स्त्री-मुक्ती संघर्षाचा केंद्रबिंदू धूसर करण्याचेच काम करतात. 'शक्ती'मधली एक आई आपल्या मुलीला बलात्कारानंतर गप्प राहून आपल्या अंतर्मनाची शक्ती वाढवण्याचा व मुकाट्याने सर्व सहन करण्याचा सल्ला देते! मालिकेतल्या प्रत्येक कार्यक्रमाचा मतितार्थ शेवटी इतकाच असतो की, सर्व प्रकारचे अन्याय स्त्रियांनी न बोलता सहन करण्याची ताकद वाढवली पाहिजे. नोकरी करणाऱ्या किंवा घराबाहेर पडून काम करणाऱ्या स्त्रीसंबंधी असणारा आकस व्यक्त करण्यात अगदी तेंडुलकरांसारख्या आधुनिक साहित्यिकानेसुद्धा पुढाकार घेतला आहे. तेंडुलकरांच्या 'स्वयंसिद्धा'ची नायिका किंवा 'उंबरठ्या'चीसुद्धा नायिका पाहा; नायिकांचे चित्रण ह्याच आकस मनात बाळगून केलेला आहे हे स्पष्टपणे दिसून येते. स्त्री संघटनांना तर जाणूनबुजून हास्यास्पद पद्धतीने त्यांनी चित्रित केले आहे. रजनी, और मी है राहे यासारख्या मालिकांमधून जे सामाजिक व व्यापक पातळीवर प्रश्न आहेत, त्यांना मर्यादित, व्यक्तिगत स्वरूपात उत्तरे दाखवून हीच खरी उत्तरे असा आभास निर्माण केला जात आहे. होनी–अनहोनी नावाची आणखी एक भयानक मालिका सध्या दाखवली जात आहे. पुनर्जन्म, टेलिपथी, चमत्कार वगैरेसारख्या विषयांवरील ही मालिका लोकांच्या व विशेषतः स्त्रियांच्या मनाची पकड फार प्रभावीपणे घेत आहे. अज्ञानातून व अशास्त्रीय दृष्टिकोणातून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धांच्या पकडीतून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी धडपड करणाऱ्या, जवळ जवळ सर्व छटांच्या स्त्री संघटना आणि जनमानसात वैज्ञानिक विचार रुजवण्यासाठी काम करणाऱ्या संघटना ह्यांच्या आजवरच्या कामावर पाणी

ओतणारी ही मालिका आहे.

संघर्षाच्या वाटेवर चालताना स्त्रीला ज्या अनेक सामर्थ्यशाली विरोधकांना नित्य तोंड द्यावे लागते त्यांचे थोडक्यात वर्णन करण्याचा हा प्रयत्न आहे. हे विरोधक कधी मानसिक पातळीवर, कधी व्यक्तिगत पातळीवर, कधी संस्थात्मक पातळीवर, तर कधी शासकीय पातळीवर दृश्य आणि अदृश्य अशा स्वरूपात वावरत असतात. त्यांना नेमके हेरून, त्यांच्याविरुद्ध लढे उभे करण्याचे काम स्त्री मुक्ती संघटनांना मोठ्या जागरूकतेने आणि हिमतीने करावे लागत आहे. हे विरोधक वरवर पाहता स्वतंत्रपणे व वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करतात असे वाटत असले तरी त्यांना एका दुव्यात बांधणारे काही समान सूत्र सापडते का हे आपल्याला आता पाहायचे आहे.

□

# ३. समग्र परिवर्तनाची गरज आणि दिशा

आमच्या कामाच्या आधारे, भारतातल्या स्त्री मुक्ती आंदोलनाला कोणकोणत्या महत्त्वाच्या प्रश्नांवर आज लढे उभे करावे लागते आहेत याचा आपण परामर्श घेतला. हे लढे उभे करताना स्त्रीला कोणत्या प्रबळ शक्तींविरुद्ध ठाम भूमिका घ्यावी लागत आहे हेही आपण पाहिले. परंतु प्रत्येक समस्या स्वतंत्रच असून त्या संबंधीचे लढेही एकमेकाला आणि समाजात चाललेल्या इतर लढ्यांना समांतर आहेत, की ह्या सर्व अनुभवावरून आपल्याला आजच्या भारतीय समाजव्यवस्थेसंबंधी व त्यात असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नाच्या स्थानासंबंधी काही एकसंध चित्र दिसते हे बघायला हवे. वैचारिक पातळीवर स्त्री-मुक्तिच्या प्रश्नाचे स्थान निश्चित ठरल्याखेरीज आंदोलनाला तसेच संघटनेला बळकटी येणार नाही. थोडक्यात, लढ्यातील आलेल्या अनुभवांचे ‘ जिग सॉ पझल ’ याप्रमाणे विखुरलेले तुकडे एकत्र जुळवून, त्यातून काय चित्र निर्माण होते हे बघण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

वास्तविक, आतापर्यंत मी चळवळीचे जे अनुभव विशद केले ते सागरातल्या हिमपर्वताच्या दृश्य शिखराप्रमाणे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात वेगवेगळ्या प्रांतात, शहरात व ग्रामीण भागात स्त्रियांनी जे कर्तृत्व व बहादुरी दाखवलेली आहे, त्याचा परामर्श इतक्या छोट्या पुस्तिकेत घेता येणे शक्यच नाही. भारतीय समाजात जेवढी विविधता आणि जेवढी गुंतागुंत आहे, तेवढेच या समाजातील प्रश्नही भिन्न भिन्न व त्यांना सोडवण्याचे मार्गही तसेच गुंतागुंतीचे. पण ह्या जटिल गुंतागुंतीतूनही जाणवलेली एक गोष्ट निश्चित आहे की भारतीय जनजीवनातील एकही घडामोड अशी नाही की जिचा परिणाम भारतीय स्त्रीच्या जीवनावर होत नाही. हुंडा, बलात्कार, पोटगी, सती

हे तर खास तिचे प्रश्न झालेच; परंतु जातीय व धार्मिक तणाव, औषधांसंबंधी राष्ट्रीय धोरण, परकीय भांडवलाला परवानगी दिली जावी किंवा नाही, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतातील हालचाली, इत्यादी सर्व प्रश्नांचासुद्धा भारतीय स्त्रीच्या जीवनाशी जवळचा संबंध आहे.

## स्त्रीमुक्तीचे व्यापक संदर्भ

उदाहरणार्थ, स्मॉल स्केल इंडस्ट्रीमध्ये कोणकोणत्या उत्पादनांना परवानगी असावी आणि असे लघुउद्योग करणाऱ्या छोट्या छोट्या कारखान्यांना शहराच्या कोणत्या भागात काम करण्यास परवानगी असावी हा काही वरवर पाहता स्त्रियांचा प्रश्न नाही. परंतु ह्या बाबतीत हेतुपुरस्सर केलेल्या धोरणात्मक गडबडीमुळे निर्माण झालेल्या त्रासातून मुक्त होण्यासाठी गेली अडीच वर्षे आमची दिल्ली शाखा सातत्याने काम करत आहे. दिल्ली शहरांतर्गत काही खेडी आहेत. यातल्या एखाद्या खेड्यातील 'लाल डोरा' विभागात एखाद्याने लघुउद्योग सुरू केल्यास त्याच्या उद्योगावर कॉर्पोरेशनचे नियंत्रण चालत नाही. लघुउद्योगांच्या क्षेत्रात कोणती रसायने वापरली जावीत ह्यासंबंधी फारसे कडक नियम नाहीत आणि असल्यास ते काटेकोरपणे न पाळण्याचे अनेक सोपे मार्ग आहेत. छोट्या उद्योगातून निर्माण होणाऱ्या दूषित पर्यावरणाचे नेमके मोजमाप करू शकणारी यंत्रणा सरकारकडे अद्याप उपलब्ध नाही. पर्यावरणाच्या प्रदूषणाचे निकष मोठे उद्योग ध्यानात ठेवूनच ठरवले गेले आहेत. ह्या गोष्टींचा फायदा घेऊन एका उद्योजकाने लाल डोरा विभागात अगदी भर वस्तीत एक डांबराची फॅक्टरी सुरू केली. गावकरी व विशेषतः स्त्रिया—कारण त्याच दिवसभर घरी असतात—त्यातून निघणाऱ्या दुर्गंधीने गेली तीन वर्षे बेजार आहेत. गेली दोन-अडीच वर्षे आम्ही ही फॅक्टरी हलविण्यासाठी धडपड करत आहोत. या संघर्षाच्या तपशीलात मी जात नाही; कारण तो एक प्रचंड किस्सा आहे. परंतु ही फॅक्टरी हलवायची झाल्यास सरकारच्या लघुउद्योगाच्या मूलभूत धोरणातच काही बदल करावा लागेल. परंतु लघुउद्योगांना दिलेली परवानगी म्हणजे राजकीय खिरापत वाटण्याचे एक मोठेच क्षेत्र असल्याने, त्याच्या मुळावर घाला घालण्याला अगदी स्थानिक नगरसेवकापासून ते केंद्रीय कॅबिनेट मंत्र्यांपर्यंत कोणीच तयार नाहीत. मुद्दाम ठेवलेल्या कायद्यातील पळवाटांमुळे हजारो नागरिकांचे, विशेषतः स्त्रियांचे दैनंदिन जीवन दुर्धर झाले आहे, पण याची पर्वा कोण करतो? वरवर पाहता स्त्री-संघटनेशी काहीच संबंध नसलेला हा प्रश्न आता आमच्या लढ्यामधला एक महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे.

ह्या आणि अशा असंख्य लढ्यांमधून जीवनाशी निगडित प्रत्येक प्रश्नाच्या मुळात जाण्याची आणि त्यासंबंधीच्या धोरणांना पारखण्याची आवश्यकता स्त्री-संघटनांना असल्याचे आमच्या अनुभवांनी आम्हाला शिकविले. ई. पी. फोर्ट औषधाचा स्त्रियांच्या आरोग्यावर होणारा परिणाम बंद करावयाचा असेल तर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी

...३

आपल्यावर लादलेल्या ह्या औषधांना परवानगी देण्यात कोणाकोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, त्यांना चव्हाट्यावर आणले गेले पाहिजे. आयात-निर्यातीच्या धोरणांचा स्त्रियांच्या रोजगारावर काय परिणाम होतो याचा कसून शोध घेतला पाहिजे. हे आम्ही आमच्या दैनंदिन लढ्यातून शिकलो. ही नुसती दोन-तीन उदाहरणे वानगीदाखल दिली. देशातील प्रत्येक घडामोड स्त्रियांच्या जीवनावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम करत असते. आजच्या भारतीय स्त्रीच्या वाटणीला आलेला अपमान, अवहेलना, दुःख, दारिद्य, असमानता वगैरेंचा तिचा फक्त नशिबाशी जोडलेला संबंध तोडण्यासाठी, तिच्या जीवनाला कठपुतळीप्रमाणे नाचवणाऱ्या प्रत्येक अदृश्य दोरीच्या दुसऱ्या टोकाशी कोण कोण आहेत व त्यांचे एकमेकांशी काय नाते आहे हे उघड करणे स्त्री-संघटनांना त्यामुळे आवश्यक झाले आहे.

संघर्षाची वाट चालत असताना आणखी एक गोष्ट अधिकाधिक स्पष्ट होत गेली. आज भारतीय समाजात अपमान, अवहेलना आणि शोषण यांचे बळी असलेले स्त्रियांप्रमाणेच इतर असंख्य घटक आहेत. गावोगावच्या अद्यापही गावापासून दूर असलेल्या हरिजन वस्त्या ह्याची साक्ष आहेत. गावच्या सार्वजनिक पाणवठ्यावर अजूनही हरिजनांना निर्भयतेने पाणी भरता येत नाही. राखीव जागांच्या प्रश्नावर एवढा गदारोळ माजला असला तरी अजूनही खुद्द दिल्लीत कित्येक कॉलेजांमध्ये राखीव जागा भरू शकत नाहीत हे सत्य महाविद्यालयीन पातळीवर काम करत असताना कळले. तरुणींची छेडछाड करणाऱ्या रोडसाईड रोमिओंविरुद्ध आंदोलन करत असताना तरुण बेकारांच्या प्रश्नाचे भयानक दुष्परिणाम जाणवले. हुंडा प्रश्नही काही प्रमाणात रोजगाराच्या प्रश्नाशी जोडलेला आहे ही जाणीव हुंडा प्रश्नाच्या खोलात शिरल्यावर झाली. अर्थात ही सर्व एकास एक अशी समीकरणे नव्हेत, परंतु एकाच व्यापक समस्येची ही अनेक दृश्यरूपे आहेत असे हळूहळू जाणवायला लागले. आज दिल्लीत किमान मजुरी ४८९ रुपये आहे. काही मालक तर तेवढीही देत नाहीत, मग कितीही शोषण झाले तरी पर्वा नाही. घरी बसून कारखान्याचे काम करणाऱ्या स्त्रियांना मिळणारा पीस रेट आणि कामगारांना मिळणारी किमान मजुरी यातला परस्पर संबंध जाणवायला लागला. मुलींच्या शिक्षणाच्या प्रश्नावर काम करताना विद्यार्थ्यांचा वाढता असंतोष आणि रोजगार समस्या ह्यांच्यातले दुवे स्पष्ट होऊ लागले. अंगणवाडी, बालवाडी वगैरे विरुद्ध वस्तीपातळीवर आलेल्या तक्रारींच्या खोलात गेले तर तिथल्या कर्मचाऱ्यांच्या हलाखीच्या कथा ऐकून परत आलो. प्रश्न कोणताही असो, स्त्रियांच्या भूमिकेतून तो सोडवता सोडवता वाटेत इतर असंख्य कोडी सापडत गेली. ह्या सर्व कोड्यांचे एकच आणि चुटकीसरशी मिळणारे उत्तर आपल्याला सापडणार नसले तरी ह्या सर्व शोषित, पीडित, अपमानित घटकांची लढाई आणि आपली लढाई काही वेगळी नाही असे पुनः पुन्हा जाणवले. आपल्या सर्वांचा मुकाबला अशा काही बलाढ्य शक्तींशी आहे, ज्या स्वतःच्या स्वार्थासाठी विषमतेच्या तत्त्वावरचा समाजाच्या इमारतीचा पाया कायम ठेवण्यासाठीच धडपड करतात हे

विदारक सत्य संघर्षाच्या वाटेवर पुनः पुन्हा जाणवत गेले.

बहुसंख्य जनतेच्या जीवनावर नियंत्रण ठेवणाऱ्या ह्या शक्तींचे आकलन होण्यासाठी दैनंदिन व्यवहारातले आणि संघर्षातले साधे अनुभवसुद्धा पुरेत. झोपडपट्टीत राहाणाऱ्या कामगार स्त्रिया एकदा एकीकडे मिळणारे कमी वेतन आणि दुसरीकडे वाढणारी भरमसाठ महागाई ह्याबद्दल तक्रार करत होत्या. महागाईचा प्रश्न तर मालकांनाही भेडसावत असेलच की असा प्रतिप्रश्न त्यांच्यासमोर टाकला तर त्यांनी गेल्या दहा वर्षात औद्योगिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा सुंदर आलेख साध्या शब्दात मांडला. दहा वर्षांपूर्वी आमच्या मालकाने एक छोटी शेड टाकली होती. तीन-चार मजूर कामावर होते. मालकाची आर्थिक परिस्थिती आणि आमची ह्यात तेव्हाही अंतर तर होतेच, पण हे अंतर २५ पटींनी तरी वाढले आहे. तो भरभराटीच्या दिशेने वाढत गेला आणि आम्ही घसरत गेलो, अशी आणखीच तफावत पडली आहे. महागाई कितीही वाढली तरी त्याच्या राहणीमानात काहीच फरक पडणार नाही अशा टोकाला तो जाऊन पोचला आहे; तर आम्हाला मात्र मिठाच्या किंमतीत फरक पडला तरी पाठीवर फटका बसल्यागत जाणवते. ' अगं, तो प्रामाणिक आणि मेहनती असेल म्हणून त्याची भरभराट झाली असेल. कष्टाचं फळ शेवटी मिळाल्यावाचून राहात नाही. ' अशा भाबड्या मध्यमवर्गीय प्रश्नाला तिने तोंडात मारावी तसं उत्तर दिले : ' कुणाच्या कष्टाचं फळ कुणाला ! ' असे म्हणत तिने उत्पादन वाढवण्यासाठी मजुरांवर सतत येत असलेला दबाव, आठवड्याच्या सुटीचे उत्पादन बुडू नये म्हणून उरलेल्या सहा दिवसातच ते काम काढून घेण्याची धडपड, सरकारी इन्स्पेक्टर्सना वाटेला लावणाऱ्या अनेक युक्त्या वगैरे गोष्टींची रसभरीत वर्णने केली. राजकीय नेत्यांची आणि मालकांची चांगलीच ऊठबस असल्याने आपण सर्व एकत्रित झालो तरी काहीच करू शकणार नाही ह्याबद्दल तिची खात्री होती.

ह्या एका छोट्या उदाहरणाकडे आपण एक बऱ्यापैकी परिचित उदाहरण म्हणून दुर्लक्ष केले तरी एका वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही. ती म्हणजे बहुसंख्य लोक आज आर्थिक अडचणींना तोंड देत असले तरी काही थोडे मूठभर लोक ह्या अडचणींच्या कक्षेच्या बाहेर आहेत एवढे खरे आणि अतिशय पद्धतशीरपणे व संघटितपणे ते आपले वेगळेपण, ज्या वेगळेपणामुळे ते सबंध समाजावरच प्रभुत्व गाजवू शकतात ते वेगळेपण, टिकवण्याची धडपड करत आहेत. दिल्लीतल्या मजुरांनी नुकताच ७२ तासांचा एक अभूतपूर्व औद्योगिक संप यशस्वी करून दाखवला. मागण्या पदरात पडल्या म्हणून हा संप यशस्वी नव्हे तर तीन दिवस कामगारांचे मनोधैर्य टिकले म्हणून यशस्वी. तीन दिवसाचा संप म्हणजे मालकांचे केवढे नुकसान व्हायला हवे. पण हे नुकसान पत्करूनही मागण्या मान्य होऊ न देण्याकरता सरकारवर पूर्णपणे दबाव त्यांना ठेवता येत आहे ह्यातच त्यांची आर्थिक ताकद दिसून येते. बारा लाख मजुरांच्या परिवारांना उपासमारीची वेळ आली तरी त्यांना पर्वा नाही. पण मजुरांची पगारवाढ केल्याने स्वतःचे दीर्घकालीन नुकसान होऊ नये म्हणून सरकारी पातळीवरून मजुरांना

गप्प करण्यासाठी हरतऱ्हेचा प्रयत्न चालू आहे. हा अगदी नुकताच घडलेला प्रसंग. आज अखिल भारतीय पातळीवरही चित्र फारसे वेगळे नाही. ज्या समाजव्यवस्थेत आणि राज्यव्यवस्थेत एकूण मजूरवर्गाबद्दल एवढी अनास्था आहे, तेथे स्त्री मजुरांची अवस्था आणखी वाईट असल्यास नवल नाही. समान कामासाठी समान वेतन ही वास्तविक स्त्रियांच्या हक्काची बाब असली पाहिजे. पण आज त्यांना असमान वेतनाविरुद्ध लढावे लागत आहे आणि तेही आपल्याच सरकारविरुद्ध. ह्याचा अर्थ बहुसंख्य लोक ज्याला ' आपले ' म्हणतात ते सरकार वास्तविक दुसऱ्याच कोणाचे तरी आहे.

औद्योगिक क्षेत्रात कारखानदारांची ही दादागिरी तर ग्रामीण क्षेत्रात बड्या जमीन-मालकांची गुंडगिरी. ग्रामीण क्षेत्रात आज ९० टक्के स्त्रिया शेतमजुरी करतात. ज्यांचा छोटासा तुकडा आहे, त्यांना त्या तुकड्यातून वरकड उत्पन्न नाही, त्यामुळे शेतीतून भरभराट होण्याची शक्यता नाही. मग सर्वच मदार मोठ्या शेतकऱ्यांच्या मर्जीवर. त्यांची नीट सेवा केली, मर्जी राखली तरच गावात राहणे परवडायचे. एरवी त्यांच्या गुंडपणाचे बळी व्हायचे हे अगदी सर्वपरिचित चित्र आहे. वाढत्या महागाईचा जसा कारखानदारांना फटका बसत नाही; तसाच दुष्काळ, पूर वगैरे नैसर्गिक आपत्तींचा मोठ्या जमीनदारांनाही विशेष फटका बसत नाही. मुळात जमिनीतून मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण प्रचंड. तशात सरकारी योजनांना स्वतःच्या फायद्यासाठी राबवण्याची राजकीय ताकद! मोठा जमीनदार, मग तो सत्ताधारी पक्षाचा असो अथवा विरोधात उभा असो, आपल्या जमीनदारी स्वार्थाचे रक्षण करण्यासाठीच तो उभा असतो. शेतमजुरांसाठी किमान वेतन, जमिनीचे फेरवाटप किंवा स्त्रियांना संयुक्त मालकी वगैरेंसाठी लढण्यात त्याला विशेष रूची नसते, हे महाराष्ट्रातल्या काय किंवा सध्या उत्तर प्रदेशात चाललेल्या काय, श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांच्या आंदोलनांवरून सिद्ध होते.

परंतु लोकशाहीच्या नावाखाली करोडो लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून काही मूठभर लोकांच्या स्वार्थाचे रक्षण करावयाचे ही काही सामान्य कसरत नाही. त्यासाठी अनेक युक्त्याप्रयुक्त्या कराव्या लागतात. धर्म, जाती, भाषा, प्रांत, संस्कृती, स्त्रीत्व अशा अनेक अस्मितांचा बागुलबोवा उभा करून आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेल्या असमानतेला आणखी एका असमानतेची काट द्यावी लागते. लोकांमधे विभाजन करून पुन्हा ते विभाजन जिवंत ठेवावे लागते. अशा अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा आधार घेतल्याखेरीज आर्थिक ताकद असणाऱ्या ह्या गटाला आपली राजकीय अधिसत्ता टिकवता येत नाही असाही अनुभव स्त्री-मुक्तिच्या दिशेने वाटचाल करत असता पदरी पडला.

## राजकारण समजून घ्या!

आता आपल्याला असे वाटेल की स्त्री–मुक्तिच्या प्रश्नात हा आर्थिक व राजकीय अधिसत्तेचा भलताच प्रश्न कुठून आला? आज देशातल्या कुठल्याही घडामोडीचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम स्त्री-जीवनावर होत आहे हे तर प्रथमच पाहिले. मग

ह्या अनुभवाचा तर्कशुद्ध निष्कर्ष हाच निघू शकतो की स्त्री-मुक्ती आंदोलनाला प्रत्येक घडामोड आणि त्यामागचे राजकीय डावपेच ह्यांचे अकलन करून घेणे अपरिहार्य आहे. येथे पक्षीय अथवा निवडणुकांचे राजकारण ह्या अर्थी राजकीय डावपेच असे अभिप्रेत नसून आज आर्थिक शोषणाचा व असमानतेचा पाया दृढ करण्यासाठी कोण काय डावपेच खेळत आहे व त्याचा स्त्रियांवर काय परिणाम होत आहे हे डोळ्यात तेल घालून पाहणे स्त्रियांना आवश्यक आहे. त्यासाठी लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्त्वांसाठी भांडणाऱ्या समाजाच्या इतर घटकांबरोबर हातमिळवणी करून लढे उभे केले पाहिजेत व निवडणुकीच्या राजकारणाला शह देत देत समानतेचे राजकारण जनमानसात रुजवले पाहिजे.

ज्या आर्थिक धोरणांचा स्वातंत्र्योत्तर काळात पाठपुरावा केला गेला त्या धोरणांचे अर्थशास्त्रीय विश्लेषणतज्ज्ञ आपल्या परिभाषेत करतातच. पण ती परिभाषा कळली नाही तरी त्या झोपडपट्टीतल्या बाईप्रमाणे एवढे निश्चित कळते की आज जी भयंकर महागाई वाढत आहे, बेसुमार बेरोजगारी आहे, गरीब-श्रीमंतामधली दरी प्रचंड वाढत आहे, त्यामागे काहीतरी जबरदस्त आर्थिक संकट आहे व त्याने आपणा सर्वांच्याच जीवनाला ग्रासले आहे. ह्या संकटांची झळ अल्पशा प्रमाणात बड्यांनाही पोचत असेल; पण त्यांना त्यातून मुक्त करण्यासाठी करांमध्ये सवलती, परवाने, आयात परवाने वगैरेंची खैरात; ग्रामीण भागात कर्जमुक्ती मेळावे इत्यादी अनेक युक्त्या आखण्यात आलेल्या आहेत. सर्वसामान्य जनतेच्या पाठीत मात्र महागाईचा रट्टा बसतो. नाणेनिधीचे कर्ज आणि त्यानंतर कमी कमी होत गेलेल्या विकास योजना, वाढलेली महागाई, ह्याचा कार्यकारण संबंध तपासला पाहिजे. ह्या व अशा इतर आर्थिक घडामोडींमध्ये प्रत्यक्षात कोणाचा फायदा झाला आहे ह्यावर लक्ष ठेवायला हवे. ही प्रक्रिया स्त्री-संघटनांनी समजावून घ्यायला हवी.

समाजाला विभाजित ठेवण्यामागे तर उघडउघड सत्तेचे राजकारण आहे. हिंदू कोड बिलाचे जोरदार समर्थन करणारा गट एके काळी काँग्रेसमधे होता. त्याच काँग्रेसने १९८६ मधे मुस्लिम महिला विधेयक पास केले ह्याला विशिष्ट अर्थ आहे. ह्या काळ्या बिलाला जनता पार्टीच्या एका खासदाराने जोरदार पाठिंबा दिला. तरीही त्या तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्षाने त्याला पक्षातून काढले नाही हेही नमूद करण्यासारखे आहे. सती प्रकरणी काँग्रेस, जनता व भाजप या पक्षांचे नेते चुनरी महोत्सवास हजर राहिले, इतकेच नव्हे तर नंतर त्याचे समर्थनही करत होते. मुख्यमंत्र्यांचे निवेदन आठ दिवसांनी तर पंतप्रधानांचे एकवीस दिवसांनी आले. ह्या सर्वांमागे स्त्री-हत्येला, स्त्री-अधिकारांना नगण्य गणण्याची भावना तर आहेच, पण ह्या निमित्ताने धार्मिक भावना जिवंत ठेवून त्यांचा निवडणुकांच्या राजकारणात फायदा उठवण्याचा हेतू स्पष्ट आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणाचा वापर हळुहळू लोककल्याणाऐवजी निवडणुका जिंकण्यासाठी केला जात आहे ही आपणा सर्वांच्या परिचयाची बाब आहेच. हे राजकारण

करण्यासाठी धर्माचा वापर करण्याची सत्ताधाऱ्यांची गरज अधिकाधिक वाढू लागली आहे. दुसरीकडे, सत्ताधाऱ्यांवरही ज्यांची अधिसत्ता चालते, त्या आर्थिकदृष्ट्या प्रबळ गटांनाही आपली ही हुकमत चालवण्यासाठी धर्माचा वापर करण्याची, आणि त्या वापराचे ओंगळ प्रदर्शन करण्याची आवश्यकता दिवसेंदिवस अधिक भासू लागली आहे. मुस्लिम मोर्चाचे नेतृत्व हाजी मस्तान करतो आणि ह्या दबावासमोर राजीव गांधी मान तुकवतात, ह्यामागे हाजी मस्तानचा इस्लामचे रक्षण करण्याचा प्रामाणिक हेतू होता किंवा राजीव गांधींनी लोकांच्या धार्मिक भावना न दुखावण्याचे लोकशाही तत्त्वाचे अनुकरण केले, असे समजणे निव्वळ भाबडेपणाचे होईल. सतीप्रकरणी धर्मकारण, राजकारण आणि अर्थकारण ह्यांचा परस्परसंबंध किती सूक्ष्मपणे व हुशारीने हाताळला जातो ह्याचे पुनः एकदा प्रत्यंतर आले. राजस्थानात अनेक ठिकाणी सती मंदिरे आहेत. रूपकुंवर प्रकरणी योग्य वेळी हस्तक्षेप झाला नसता तर आणखी एक मंदिर झाले असते. ही मंदिरे बांधण्यामागील आर्थिक स्वार्थ काही अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासातून आता स्पष्टपणे दिसून आला आहे. ह्या मंदिरांना प्रचंड देणग्या मिळण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ह्या देणग्यांना मिळणारी करातली सूट. अशी सूट मिळवून, प्रथम देणग्या देऊन धार्मिक ट्रस्ट उभा करावयाचा व मग ट्रस्टकडून कमी व्याजात कर्ज घेऊन पुनः त्याची गुंतवणूक करावयाची, हे धर्माच्या नावाखाली चाललेले उघडउघड अर्थकारण आहे. आणि हे निर्धास्तपणे चालू ठेवण्यासाठी राजसत्तेवर असलेल्यांचे नियंत्रण करण्याच्या अनेक युक्त्या काढल्या जात असतात. सती प्रकरणी हरिदेव जोशी काही कडक उपाय करावयास बिचकले ते ह्यामुळेच. बिर्ला, झुनझुनवाला आणि इतर अनेक उद्योगपतींचे हितसंबंध त्यात गुंतले असल्याने, रूपकुंवर किंवा तत्सम इतर मुलींची हत्या हा प्रश्नच दुय्यम ठरत गेला आणि धर्मरक्षणाच्या नावाने ओरडा झाला. हे अंतस्थ डावपेच न समजणाऱ्या हजारो पापभीरूंच्या मनात त्यामुळे गोंधळ सुरू होतो व अशा वेळी समाजाच्या धार्मिक भावनांचे तारू वाचविण्यासाठी स्त्रियांच्या बळी दिला जातो हे राजकारण आता स्त्रियांनी समजून घेतलेच पाहिजे. अन्यथा हाजी मस्तानसारख्या स्मगलरकडून किंवा बिर्ला–डालमियांसारख्या उद्योगपतींकडून 'नैतिकतेचे व धार्मिकतेचे' संरक्षण करण्यासाठी येणाऱ्या दडपणातून स्त्रियांची मुक्ती होणार नाही. आणि हे दडपणही किती हुशारीने, सूक्ष्मपणाने आणले जाते पाहा. एखाद्या प्रश्नावर वादविवाद सुरू झाला की रेडिओ, टी. व्ही., वृत्तपत्रे आणि नियतकालिके ह्या सर्व प्रसारमाध्यमांच्या हालचालींना एकदम गती येते. ह्या माध्यमांनी स्वतःच्या स्वायत्ततेचा आणि निःपक्षपातीपणाचा कितीही गवगवा केला तरी त्यांना ज्या विशिष्ट पक्षाची बाजू घ्यावयाची असते तो पक्षच समाजासमोर मांडला जातो. आबिदा बेगमची मुस्लिम महिला विधेयकाचे समर्थन करणारी दिल्ली पातळीवरील रॅली टी. व्ही.वर सविस्तर दाखवण्यात आली आणि ऑल इंडिया डेमोक्रॅटीक वुमेन्स असोशिएशनने अखिल भारतीय पातळीवर केलेल्या मुस्लिम महिलांच्या आजवर झालेल्या एकमेव व ऐतिहासिक रॅलीचे काही अंशसुद्धा दाखवले नाहीत हे

आधी सांगितलेच आहे. सती समर्थनार्थ जे लाचार व वैचारिक गुलामीचे प्रदर्शन करणारे लेख एरवी आधुनिक व परखड समजणाऱ्या वृत्तपत्रांमधून लिहिले गेले, त्यामागची ह्या वृत्तसंस्थांची मालकी कोणाकडे आहे ही 'वस्तुस्थिती' स्त्रियांनी समजून घेतली पाहिजे. मुस्लिम महिला विधेयकाद्वारे मुस्लिम कट्टरवाद्यांना खूष करून झाल्यावर राम-जन्मभूमीच्या प्रश्नावर हिंदूंच्या बाजूने निकाल दिला गेला व धार्मिक तणाव सतत जागृत ठेवण्यात आले. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर जे शीख हत्याकांड झाले, त्यात स्थानिक काँग्रेसचे पुढारी व पोलीस ह्यांची हातमिळवणी कशी होती हे दिल्लीच्या जनतेला चांगलेच माहीत आहे. मेरठच्या दंग्यांमधले मलियाना कांड राजकीय हस्तक्षेपावर चांगलाच प्रकाश पाडते. ह्या सर्व राजकीय प्रक्रिया स्त्री-संघटनांना समजल्या पाहिजेत. स्त्रियांना राजकारण समजले पाहिजे, ह्याचा अर्थ त्यांनी राजकारण केले पाहिजे असा नसून त्यांच्या प्रत्येक प्रश्नांचा राजकीय अर्थ लावण्याची त्यांची ताकद वाढली पाहिजे. म्हणजेच त्यांना आपले शत्रू कोण व मित्र कोण हे स्पष्टपणे दिसू लागेल.

पण आज जसजशा काही स्त्री-संघटना स्त्रियांच्या प्रश्नांमागील ह्या गंभीर राजकीय व आर्थिक गुंतागुंतींना चव्हाट्यावर आणत आहेत व स्त्री-प्रश्नाचे राजकीय दृष्टिकोणातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तसतसा स्त्री-प्रश्न राजकीय नव्हे, तो फक्त पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या समाजाच्या मानसिक प्रवृत्तीतून निर्माण झालेला प्रश्न आहे असा हेतुपुरस्सर प्रचार काही पातळ्यांवरून केला जात आहे. राजकारणाचे वावडे असणाऱ्या ह्या मंडळींचे स्वतःचे एक राजकारण असतेच. प्रचलित आर्थिक-राजकीय हितसंबंधांना मूलभूत धक्का न देता, काही आधुनिक भूमिका घेऊन व काही सामाजिक प्रवृत्ती बदलून समाजात काही बदल घडवण्याची त्यांची भूमिका असते. सामाजिक प्रवृत्ती ज्या अर्थकारणातून घडतात ते उघडकीस आणणे कधी नकळत तर कधी हेतुपुरस्सर टाळले जाते. साहजिकच असल्या स्त्री-संघटनांना प्रस्थापितांकडून उचलले जाते, प्रसिद्धी दिली जाते. ह्या व अशा सर्व घटकांवर बारकाईने नजर ठेवण्याचे काम स्त्रियांनी केले पाहिजे व स्वतःच्या संघर्षाच्या अनुभवावर लढ्याचा योग्य मार्ग चोखाळला पाहिजे. राजकारणाला नाके मुरडणाऱ्या अनेक छोट्या छोट्या स्त्री-संघटनांनाही सती-प्रकरणी अखेर राजकीय भूमिका घेणे प्राप्तच झाले असा आमचा अनुभव आहे.

## स्त्री-संघटनांच्या संयुक्त प्रयत्नांची गरज

असा हा लढ्याचा मार्ग चोखाळण्याकरता स्त्री-मुक्तिसाठी काम करणाऱ्या संघटनांची एक व्यापक आघाडी उभी राहिली पाहिजे. अशी व्यापक आघाडी उभी करणे हे वाटते तेवढे सोपे काम नाही. प्रत्येक संघटनेचा आपला एक स्वतंत्र दृष्टिकोण असतो व त्या दृष्टिकोणाच्या मर्यादेतच काम करण्याची ज्याची त्याची प्रवृत्ती असते. अनेक संघटनांना वाटते की आपले पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी सरकारने ज्या छोट्यामोठ्या विकास

योजना आखल्या आहेत, त्या राबवण्यात मदत केली की गरिबांना मदत केल्याचे पुण्यश्रेय आपल्याला आणि सरकारला दोघांनाही मिळेल. बहुधा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या सुशिक्षित बायकांना पत्ते वगैरे खेळून झाले की उरलेल्या वेळात कंटाळा येऊ नये म्हणून हे समाजकार्य करायची हुक्की येते. सरकार-दरबारी संपर्कही असतो तेव्हा झोपडपट्टीत जाऊन काही ना काही करणे अथवा पत्रकारांना बोलावून फोटोग्राफरच्या उपस्थितीत साक्षरता वर्ग घेणे वगैरे ह्यांचे कार्यक्रम असतात. अशा संघटनांना स्त्री-मुक्ती संघटना म्हणणे अवघड असले तरी स्त्री-मुक्तिची टवाळकी व उपहास करणाऱ्यांना त्या भरपूर खाद्य पुरवतात; म्हणून मुद्दाम त्यांचा उल्लेख केला. काही इतर संघटना ह्याहून अधिक भरीव काम स्त्रियांच्या सामूहिक मुक्तीसाठी नाही तरी व्यक्तिगत पातळीवर मदत करण्यासाठी करत असतात. केसेस घेतात. आधार केंद्रे चालवतात. हुंडा, महागाई, सती वगैरे प्रश्नांवर एक मोठी आघाडी बनवण्यासही तयार असतात; पण जरा कुठे सरकारविरोधाचा वास आला की बहुधा विचकल्याच!

ह्याच्या बरोबर उलट दुसऱ्या काही संघटना. एरवी त्यांचा सरकारविरोध अत्यंत तीव्र पण राजकीय दृष्टी अतिशय भाबडी. राजकारण केले नाही तरी राजकारण समजले पाहिजे असे जे मी आधी म्हटले ते अशा संघटनांच्या अनुभवावरूनच. आंतरराष्ट्रीय महिला दिवस संयुक्तपणे करता येईल काय याच्या वाटाघाटी चालू होत्या. आंतरराष्ट्रीय महिला दिवस हा तर खास स्त्रियांच्या अधिकाराचा दिवस. तेव्हा तो अधिकार त्यांना नाकारणाऱ्यांचे राजकारण त्या दिवशी स्पष्टपणे मांडता आले पाहिजे. ज्या काँग्रेस सरकारने स्त्रियांच्या हक्कांवर इतके हल्ले केले, त्याच सरकारच्या प्रतिनिधी मंत्र्याला ८ मार्चच्या कार्यक्रमास बोलावून आपल्या संघर्षाची धारच बोथट होते हे काही केल्या त्यांना पटेना, व अखेर संयुक्त कार्यक्रम होऊ शकला नाही. 'सुधा गोयल' ह्या गाजलेल्या हुंडाबळी प्रकरणी सुप्रीम कोर्टात संयुक्त याचिका देण्यासाठी स्त्री-संघटनांनी एकत्र यायचे ठरवले; पण केस लढण्यासाठी स्त्री वकीलच हवी ह्या मुद्यावर काही संघटना अडून बसल्या. नुकत्याच झालेल्या सती प्रकरणी जनता पक्षाचे लोक अडून बसले की भाजपच्या महिलांनाही बोलावले पाहिजे; कारण त्यांच्यातल्या काहीजणी सतीविरोधी भूमिका घ्यायला तयार आहेत. सतीचे पूर्ण प्रकरणच धर्म आणि राजकारण ह्यांची गल्लत करून उभे केलेले आहे. प्रश्न भाजपचे आमदार देवरालाला गेले होते की नाही, खा. वाजपेयींनी काय निवेदन काढले, एवढाच नव्हता. तर धर्म व राजकारण यांच्यातल्या संबंधाविषयीची आपली मूलभूत भूमिका काय असावी हा प्रश्न होता. जेथे भाजपचा सैद्धांतिक आधारच धर्माधिष्ठित आहे, तेथे कोणत्याही प्रश्नाकडे धर्मनिरपेक्ष दृष्टीकोणातूनच पाहणाऱ्या संघटनांना कुठल्याही परिस्थितीत भाजपबरोबर जाण्याची तडजोड परवडणे शक्य नाही. त्यामुळे संयुक्त आघाडीची विश्वासार्हताच कमी झाली असती. हे दोनचार अनुभव मुद्दाम सांगायचे कारण हे की ज्या प्रश्नावर आघाडी उभारली जात आहे, त्या प्रश्नाच्या पाठीमागील राजकारणाचे स्पष्ट आकलन हवे.

अन्यथा प्रश्नाच्या केंद्रबिंदूवरील ध्यान सुटून आंदोलन भरकटत जाण्याची दाट शक्यता निर्माण होते.

अर्थात हे धोके पत्करूनही प्रत्येक प्रश्नाच्या व्याप्तीनुसार मोठ्यात मोठी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न करून स्त्री-मुक्ती आंदोलनाचे महत्त्व जनमानसात आणि राजकीय क्षेत्रात ठसवले पाहिजे. ज्या ज्या महत्वाच्या प्रश्नावर संयुक्त आघाडी आजवर उभी राहिली आहे, त्या विशिष्ट प्रश्नांना या आघाडीच्या प्रयत्नातून एकदम अखिल भारतीय परिमाण लाभले. समाजाच्या सर्व थरांमधे वैचारिक देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर झाली. आणि खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे स्वरूप त्याला प्राप्त होऊन काही मूलभूत कायदेशीर बदल घडून आले. हुंड्याच्या प्रश्नावर अशा व्यापक आघाडीने केलेली कामगिरी भरीव आहे. दहा वर्षांपूर्वी हुंड्यासाठी छळ सोसणाऱ्या मुलीला तोंड दाबून तो सहन करण्याव्यतिरिक्त काही पर्यायच नव्हता. आज तिला योग्य वेळी, योग्य मार्गदर्शन मिळाल्यास आपल्या जीवनाचा मार्ग काही प्रमाणात बदलता येतो. मुलीचा खून अपघाती मृत्यू ह्या सदराखाली लपून न राहता निदान गुन्हेगारांना शिक्षा होण्याची सोय प्राप्त झाली आहे. प्रचंड अडचणी सहन करून मुलीला दिलेले सामान तिला त्रास होत असल्यास तिच्यासह परत मिळण्याची कायदेशीर सोय आज झाली आहे. ह्याचा अर्थ हुंडापद्धती बंद झाली आहे असे नव्हे, पण ती बंद होण्यासाठी निदान तो गुन्हा आहे हे वैचारिकदृष्टया व कायदेशीर पातळीवर अधिकृतरीत्या स्वीकृत होण्याइतकी वाटचाल ह्या लढ्यामधून झाली आहे आणि हा एक महत्वाचा टप्पा आहे.

## समग्र परिवर्तनाची दिशा घेऊन वाटचाल

स्त्रियांनी उभ्या केलेल्या ह्या लढ्यांची टिंगलटवाळी करताना, ‘ कायदा करून काय होणार आहे, लोकांमधे जा, प्रवृत्ती बदला ’ असा फुकट सल्ला दिला जातो. कायदा करून गुन्हे थांबत नसतात हे कोणालाही ठाऊक आहे. खून, चोरी, दरोडेखोरी वगैरेविरुद्ध कायदे आहेत पण गुन्हे थोडेच थांबले आहेत ? पण त्यांना गुन्हा म्हणून स्वीकृत करणे समाजस्वास्थ्यासाठी आवश्यक अशी पूर्वअट आहे. हुंडा घेण्याला गुन्हा म्हणून कायदेशीर संमती मिळाल्यावर त्या प्रश्नांवर काम करताना एक प्रचंड आधार सापडतो. आमच्या संघटनेने चालवलेल्या मोफत कायदेशीर सल्ला केंद्रावर दर शनिवारी उसळणारी गर्दी पाहिली की कोणालाही ह्या म्हणण्यातील सत्यता पटेल. इतर संघटनांचा अनुभवही आमच्यापेक्षा वेगळा नाही. शेकडो तरुणी आपले सामान परत घेऊन सन्मानाने माहेरी जातात. कुणी पुनः लग्न करून नवे जीवन सुरू करतात. कुणाच्या पोटगीचा प्रश्न सुटतो तर कधी दोन्ही पक्षात अकारण निर्माण झालेले गैरसमज दूर होऊन पतिपत्नी पुन्हा आनंदाने नांदू लागतात. मिठाई घेऊन अशी मंडळी आली की त्यांच्या ह्या आनंदामागे आमच्या शेकडो कार्यकर्त्यांना ह्यासाठी रस्त्यावर बसून किती वेळा अटक करून घ्यावी लागली आहे ते आम्ही आवर्जून सांगतो. आमच्या कित्येक कार्यकर्त्या अशा स्वतःच्या

अडचणीसाठी आमच्याकडे आल्या असताना स्वतःच्या अनुभवातून आणि त्यांच्या अडचणीत संघटनेने दिलेल्या साथीतून प्रेरणा घेऊन काम करायला तयार झालेल्या आहेत. कित्येक जणींना दैनंदिन कामासाठी येणे जमण्याजोगे नसले तरी वेगवेगळ्या प्रश्नावरील मोर्चा, निदर्शनांसाठी त्या येतात. कुणी काहीच सक्रिय काम करण्याजोग्या नसल्या तरी आपल्या घराच्या अवतीभवती, नातेवाइकांमधे संघटनेचा नकळत प्रचार करत असतात. आमच्या संघटित प्रचाराइतकेच त्यांच्या अदृश्य प्रचाराचे प्रचंड महत्व आहे.

मुस्लिम स्त्री विधेयकावर आम्ही केलेल्या कामातून दिल्लीच्या अगदी कट्टर मुस्लिम समजल्या जाणाऱ्या जामा मशिद विभागातून आमच्याकडे येणाऱ्या स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. फक्त स्वतःच्या अडचणीसाठीच त्या येत नसून त्यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे एक भक्कम शाखा आम्ही तिथे बनवू शकलो आहोत. आज आमच्या प्रत्येक मोर्चा, निदर्शनात मुस्लिम स्त्रियांची लक्षात येण्याजोगी उपस्थिती असते. जामा मशिद-चांदणी चौक विभाग हा हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्मांच्या कट्टरपंथीयांचा बालेकिल्ला आहे. धार्मिक तणाव तिथे सतत जिवंत असतो. अशा वस्तीत आम्ही धार्मिक दंग्यांविरुद्ध नाटक करायला आमच्या संघटनेचा ग्रुप घेऊन गेलो होतो. मुळात दिल्लीसारख्या शहरात तरुण मुलींनी रस्त्यात नाटक करणे, तेही अशा वस्तीत व वातावरणात, हेच एक धाडसाचे काम होते. तशात नाटकाला लागणारे सामान काढल्यावर, त्यातला त्रिशूळ बघून वातावरण तापू लागले. २५–३० मंडळी एकत्र येऊन आमच्याभोवती आक्रमक पवित्र्यात उभी राहिली. पण आमच्या स्थानिक मुस्लिम कार्यकर्त्यांनी न डगमगता त्यांना निर्भयपणे संघटनेची धर्मासंबंधीची भूमिका समजावून सांगितली व नाटक बघून स्वतःचे मत बनवण्याची विनंती केली. नाटक पाहिल्यावर ह्याच मंडळींनी प्रत्येकी दहा दहा रुपये काढून आम्हाला भरघोस मदत केली. सती प्रश्नावर प्रचारार्थ कॉलेजांमधे गेलो असताना तरुण मुलींकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. लेडी अर्विन कॉलेजमधल्या तर सर्वच्या सर्व मुली मोर्चात भाग घेण्यासाठी आल्या होत्या. वास्तविक आम्ही त्यांच्याकडे फक्त एकदाच, तेही मोर्चाच्या आदल्या रात्रीच जाऊ शकलो होतो. सती समर्थकांनी जयपूरमध्ये काढलेल्या मोर्चापासून तरुण, सुशिक्षित मुलींच्या मनात एक अनामिक भीती दडून राहिली होती. आमच्या मोर्चासाठी प्रचारार्थ गेलो असताना झालेल्या चर्चांमधून ती अगदी स्पष्टपणे दृग्गोचर झाली. 'आपल्या विरोधात असलेली शक्ती जर एवढी संघटित आहे तर आपणही आपली संघटित ताकद दाखवायला नको का?' ह्या एवढ्याच इशाऱ्यावर शेकडो तरुण मुली उत्साहाने रस्त्यावर आल्या.

पण प्रश्न एका विशिष्ट प्रश्नासाठी किती लोकांना गोळा करू शकतो एवढ्यावर थांबत नाही. अनेक प्रश्नांवर वादळ उठते, संघर्ष होतात, आघाड्या बनतात, मोडतात. पण ह्या सर्वांचा आधारभूत पाया जी स्त्रियांची जनसंघटना ती मात्र आपल्या जागी

स्थिर असते. नव्या नव्या लढ्यांमधून अधिकाधिक मजबूत होत जाते. प्रत्येक लढ्यातून आपला दृष्टिकोण स्वच्छ करून जाण्याची ताकद मात्र संघटनेकडे हवी. त्यासाठी स्वतःच्या आणि इतरांच्या कार्याकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून बघून टीका करण्याची आणि स्वीकारण्याची ताकद संघटनेला वाढवता आली पाहिजे. नुसतेच तळमळीचे किंवा मेहनती कार्यकर्ते असून हे कार्य साधत नाही. त्या कार्यकर्त्यांना बांधण्याची दृष्टी हवी. शिस्त हवी. नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांना तर सर्वात अधिक शिस्त हवी. मिळालेल्या विजयातून कार्यकर्ते प्रोत्साहित होतात पण त्यांचा उत्साह टिकवून धरण्याची ताकद संघटनेकडे हवी आणि तसेच अपयशाने मनोधैर्य गळू न देता, त्यातील सकारात्मक गोष्टींनी पुनः त्यांना उत्साहित करण्याचे काम जाणीवपूर्वक करायला हवे. ह्या सर्व व्यावहारिक पातळीवरच्या गोष्टी संघटकांनी मेहनतीने करायला लागतात, तरच एक संच म्हणून सामूहिकरित्या कार्य करणे सोपे जाते. आणि शेवटचे पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघटनेची वैचारिक दृष्टी अत्यंत स्वच्छ व स्पष्ट हवी.

अशा अनेक संघटनांच्या बळावर आज स्त्री-मुक्तीचे कार्य भारतात अनेक पातळ्यांवर चालू आहे. जुन्या पुरातन संस्कृतीविरुद्ध, सरंजामी विचारसरणीविरुद्ध, आर्थिक शोषणाविरुद्ध, धार्मिक पुनरुज्जीवनाविरुद्ध, अधिकारशाहीविरुद्ध, नोकरशाहीविरुद्ध, जातीयतेविरुद्ध, अशा अनेक शक्तींविरुद्ध आज भारतीय स्त्रिया जागोजागी जागृत होऊन संघर्ष करत आहेत. आपल्या शेकडो वर्षांच्या बंधनांना तोडण्यासाठी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया सामाजिक व आर्थिक समानतेसाठी लढण्यास तयार होऊ लागल्या आहेत. आज समाजपरिवर्तनाच्या आंदोलनामध्ये स्त्री-मुक्ती आंदोलनाला एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

परंतु जातीय, धार्मिक, आर्थिक, लैंगिक भेदातून निर्माण होणारी विषमता व त्याच्या विरोधात उभे राहिलेले हे सर्व लढे आपापल्या मर्यादेत परिपूर्ण आहेत असे नसून, ज्या अर्थव्यवस्थेच्या पायावर, राज्यसत्तेच्या आधारे सबंध समाजजीवनाची इमारत उभी आहे, त्यामधील अंतर्विरोधातून ते निर्माण झालेले आहेत. स्त्री-मुक्ती चळवळीने आज ह्या संपूर्ण व्यवस्थेलाच आव्हान देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे ती यामुळेच. स्त्री-मुक्ती चळवळीच्या पुढील वाटचालीची दिशा ही असायला हवी.

□

## मागोवाची काही इतर प्रकाशने

**ललित चिंतन** / दि. के. बेडेकर / आठ रुपये

**समर्पण : डॉ. कोटणीस जीवनगाथा** / मं. शां. कोटणीस / दहा रुपये

**मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले** / नामदेव ढसाळ / दहा रुपये

**महाराष्ट्रातील दुष्काळ** / दत्ता देसाई / दहा रुपये

**आम्ही कशासाठी लढत आहोत?** / शहीद भगतसिंग / चार रुपये

**अण्वस्त्रे, शस्त्रस्पर्धा आणि शांतता आंदोलन** / चित्रा बेडेकर / बारा रुपये

**खरा कम्युनिस्ट कसे बनावे** / लिउ शाओ ची / दहा रुपये

☐

मागोवाची निवडक पुस्तके सवलतीत मिळवा !

मागोवा प्रकाशन सभासद योजनेच्या माहितीसाठी संपर्क साधा :

७५९/९७ डी, डेक्कन जिमखाना, शांतिभुवन, पुणे ४११००४

# स्त्री मुक्ती : समतेकडे वाटचाल

स्त्रियांच्या चळवळीच्या वाटचालीतले अनुभव

स्त्रीमुक्तीला विरोध करणाऱ्या प्रबळ शक्ती

स्त्रियांची चळवळ व समग्र परिवर्तनाचे राजकारण

मूल्य पाच रुपये

मागोवा प्रकाशन